# महिलांचे हक्क व कल्याण समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**जळगांव, महानगरपालिका/जिल्हा परिषद, जळगांव यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनशेष व पदोन्नती आणि जळगांव, महानगरपालिकेतर्फे/ जळगांव, जिल्हा परिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# पाचवा अहवाल

(हा अहवाल विधानसभेस/विधानपरिषदेस दिनांक १२ एप्रिल, २०१६ रोजी सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
विधान भवन, मुंबई
**२०१६**



# महिलांचे हक्क व कल्याण समिती

**(२०१५-२०१६)**

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**जळगांव, महानगरपालिका/जिल्हा परिषद, जळगांव यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनशेष व पदोन्नती आणि जळगांव, महानगरपालिकेतर्फे/ जळगांव, जिल्हा परिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांबाबतचा**

# पाचवा अहवाल

## महिलांचे हक्क व कल्याण समिती

**सन २०१५-२०१६**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री.प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश घोलप, वि.स.स.

(९) कु. प्रणिती शिंदे, वि.स.स.

(१०) श्रीमती संध्यादेवी कुपेकर, वि.स.स.

(११) श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स.

(१२) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(१३) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१४) श्री. सतिश चव्हाण, वि.प.स.

(१५) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. विलास आठवले, उप सचिव,

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव

श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी





## महिलांचे हक्क व कल्याण समिती

**सन २०१३-२०१४**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती नंदिनी देशमुख-पारवेकर, वि.स.स.

(३) ॲड.यशोमती ठाकूर, वि.स.स.

(४) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.

(५) श्रीमती शामल बागल, वि.स.स.

(६) श्री.गिल्बर्ट मेंडोसा, वि.स.स.

(७) श्रीमती संध्यादेवी देसाई ऊर्फ कुपेकर, वि.स.स.

(८) श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, वि.स.स.

(९) श्रीमती माधुरी मिसाळ, वि.स.स.

(१०) श्रीमती मिरा रेंगे-पाटील, वि.स.स.

(११) डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स.

(१२) ॲड.हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

(१३) श्रीमती दिप्ती चवधरी, वि.प.स.

(१४) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(१५) डॉ.निलम गोऱ्हे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव,

श्री. विलास आठवले, उप सचिव,

श्रीमती सायली कांबळी, अवर सचिव.

**अनुक्रमणिका**


| अ.क्र. (१) | विषय (२) | पृष्ठक्रमांक (३) |
|---|---|---|
| **१** | **प्रस्तावना** | **(सात)** |
| **२** | **अहवाल** | **(नऊ)** |
| **३** | **जळगाव, महानगरपालिका** | |
| | १.१ जळगाव, महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबात | १ |
| | १.२ जळगाव, महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी शौचालये | ७ |
| | १.३ जळगाव, महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाड्या | १० |
| | १.४ जळगाव महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महीलांसाठी सोयी सवलती. | १२ |
| **४** | **जळगाव, जिल्हा परिषद** | |
| | २.१ जळगाव, जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत | २३ |
| | २.२ जळगाव जिल्हापरिषदेमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत | २७ |
| | २.३ जळगाव, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना | ३३ |
| **५** | **परिशिष्ट "अ" - शासन निर्णय** | **४७** |
| **६** | **परिशिष्ट "ब" - बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त** | ७७ |




**प्रस्तावना**

मी महिलांचे हक्क व कल्याण समितीची समिती प्रमुख, समितीने आपल्या वतीने अधिकार दिल्यावरुन समितीचा हा पाचवा अहवाल सभागृहास सादर करीत आहे.

**"जळगाव महानगरपालिका व जळगाव जिल्हापरिषद यांच्या सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच महानगरपालिकेतर्फे/जिल्हापरिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना"** यासंबंधी समितीने माहिती जाणून घेण्याचे ठरविले. त्यानुसार जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषद संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी जळगाव, महानगरपालिका व दिनांक २३ जुलै, २०१४ रोजी जळगाव, जिल्हापरिषद येथे भेट दिली. महानगरपालिका व जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग व सचिव, कृषि व पशुसंवर्धन यांची दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१५ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उपलब्ध झालेल्या माहितीचा सर्वंकष विचार करून समितीने त्यासंदर्भात आपले अभिप्राय व शिफारशी या अहवालात समाविष्ट केल्या आहेत.

प्रश्नावलीनुसार जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने प्राप्त झालेली माहिती, शासन निर्णय तसेच समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त दिलेले आहे.

समितीच्या दिनांक ६ एप्रिल, २०१६ रोजी झालेल्या बैठकीत प्रारुप अहवालावर विचार करून तो संमत करण्यात आला.

साक्षीच्या वेळी सचिव, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, नगरविकास विभाग (१) व (२), सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, सचिव, सामान्य प्रशासन विभाग व सचिव, कृषि व पशुसंवर्धन तसेच जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषदेच्या संबंधित अधिकाऱ्यांनी समितीसमोर उपस्थित राहून समितीला आवश्यक ती माहिती देऊन सहाय्य केल्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

विधान भवन,
मुंबई,दिनांक : ६ एप्रिल, २०१६

**श्रीमती मनिषा चौधरी,**
समिती प्रमुख,
महिलांचे हक्क व कल्याण समिती

## अहवाल

## “ जळगाव महानगरपालिका व जळगाव जिल्हा परिषद ”

महिलांचे हक्क व कल्याण समितीने जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषद सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच महानगरपालिकेतर्फे/जिल्हापरिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे तसेच जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषद येथे भेट देण्याचे ठरविले त्यानुसार जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषद संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी जळगाव महानगरपालिका व दिनांक २३ जुलै, २०१४ रोजी जळगाव, जिल्हापरिषद येथे भेट दिली. जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हापरिषद यांचेकडून प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगाव, जिल्हापरिषद व आयुक्त, जळगाव,महानगरपालिका यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.

महिलांचे हक्क व कल्याण समितीने सेवेतील महिला अधिकारी/कर्मचारी यांची भरती, आरक्षण, अनुशेष व पदोन्नती तसेच महानगरपालिकेतर्फे/जिल्हापरिषदेतर्फे त्यांच्यासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना यासंबंधी माहिती जाणून घेण्याचे ठरविले. तसेच येथे भेट देण्याचे ठरविले त्यानुसार संदर्भातील माहिती मागविण्यात आली. प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे समितीने प्राप्त झालेली माहिती व समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी यांनी उपस्थित राहून समितीस माहिती दिली.



## १. जळगाव, महानगरपालिका

### १.१ जळगाव, महानगरपालिकेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :—

जळगाव, महानगरपालिकेकडून दिनांक २२ जुलै २०१४ रोजी समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी प्रश्नावलीच्या अनुषंगाने माहिती मागविण्यात आली होती.

महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे पैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती? भरतीसाठी महिलांकरिता ३०% जागा आरक्षित ठेवण्याबाबतचे निकष, भरतीची पद्धत इत्यादीबाबतची माहिती देण्यात यावी. त्या अनुषंगाने नोंदवही ठेवण्यात आली आहे का? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी जळगाव, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

महानगरपालिकेत वर्ग १ ते वर्ग ४ मधील एकूण मंजूर पदसंख्या २,६३४ असून २,३०८ पदे भरलेली आहेत. तसेच रिक्त पदे ३२६ आहेत. एकूण अधिकारी संख्या ९७ असून महिला अधिकारी ८ आहेत. एकूण कर्मचारी संख्या २,२१८ असून त्यात महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३७७ आहे. सदर पदे आदेश क्र.८९३/सीआर/६८८८/विभागीय आयुक्त, दिनांक ३१ ऑगस्ट १९८८ अन्वये व आदेश क्र. १०९४/३३८/९४/३, दिनांक २२ जानेवारी १९९७ अन्वये मंजूर आहेत. महिलांकरिता ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत. महानगरपालिकेचा आकृतिबंध व सेवाप्रवेश नियमावली शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेली असून ती अद्याप मंजूर केलेली नाही. शासन नियमानुसार महिलांसाठी समांतर आरक्षण ठेवण्यात येते. महिला उमेदवारासाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदाकरिता स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सेवाप्रवेश नियमावली व आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल. महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या भरती व सेवाविषय बाबी हाताळण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आलेला नाही. तथापि, शासनाकडून आदेश व सूचना प्राप्त झाल्यास स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात येईल.

महानगरपालिकेच्या अखत्यारित १० रुग्णालये आहेत. सदर रुग्णालयामध्ये एकूण ११ अधिकारी असून त्यापैकी ५ पुरुष वैद्यकीय अधिकारी, ५ महिला वैद्यकीय अधिकारी व १ अधीक्षक आहेत. रुग्णालयामध्ये १०३ महिला कर्मचारी व ८० पुरुष कर्मचारी आहेत.

**जळगाव, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :—**

जळगाव महानगरपालिकेला दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेची स्थापना झाल्यापासून आजमितीस महानगरपालिकेच्या सेवेत असलेले कर्मचारी व अधिकारी किती आहेत? त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी सन २००३ मध्ये जळगाव नगरपालिकेचे रूपांतर जळगाव शहर महानगरपालिकेत झाले असून जळगाव शहर महानगरपालिकेचा आकृतिबंध व सेवा प्रवेश नियमावली शासनाकडे मंजुरीसाठी पाठवली आहे. परंतु अद्याप सेवा प्रवेश नियमावली व आकृतिबंध शासनाने मंजूर केलेला नाही. सदरची मंजूर पदे नगरपालिका असतानाची आहेत. असे समितीस सांगितले.

वर्ग-१ मध्ये मंजूर पदे ७ असून त्यापैकी ५ पदे भरलेली आहेत व २ पदे रिक्त आहेत. वर्ग-२ मध्ये मंजूर पद १ असून सदर पद रिक्त आहे. वर्ग-३ मध्ये मंजूर पदे ८८५ असून त्यापैकी ६७३ पदे भरण्यात आलेली आहेत व २१२ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ मध्ये १,७४१ पदे मंजूर असून १,६३० पदे भरण्यात आली आहेत व १११ पदे रिक्त आहेत. एकूण २,६३४ मंजूर पदापैकी २,३०८ पदे भरण्यात आली असून ३२६ पदे रिक्त आहेत.

तांत्रिक वर्ग-१ व वर्ग-२ मध्ये महिला अधिकारी नाहीत. वर्ग-३ मध्ये ८९ अधिकाऱ्यांपैकी ८ महिला अधिकारी आहेत. वर्ग-३ मध्ये एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ६७३ असून त्यापैकी ५७ महिला आहेत. वर्ग-४ मध्ये १,५४५ कर्मचारी असून त्यापैकी महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३२० आहे. वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे पूर्वी भरण्यात आलेली आहेत.

अतांत्रिक वर्ग-१ मध्ये मंजूर पदे ५ असून भरलेली पदे ४ आहेत व १ पद रिक्त आहे. अतांत्रिक वर्ग-२ मध्ये मंजूर पद १ असून हे पद रिक्त आहे. अतांत्रिक वर्ग-३ मध्ये मंजूर पदे ३४७ असून ३१० पदे भरली आहेत व ३७ पदे रिक्त आहेत. अतांत्रिक वर्ग-४ मध्ये १,६१९ पदे मंजूर असून १,५२९ पदे भरली आहेत व ९० पदे रिक्त आहेत.

तांत्रिक वर्ग-१ मध्ये २ पदे मंजूर असून ही पदे रिक्त आहेत. तांत्रिक वर्ग-२ मध्ये मंजूर पद नाही. तांत्रिक वर्ग-३ मध्ये ५३८ मंजूर पदे असून त्यापैकी ३६३ पदे भरली आहेत व १७५ पदे रिक्त आहेत. तांत्रिक वर्ग-४ मध्ये मंजूर पदे १२२ असून त्यांपैकी १०१ पदे भरण्यात आली आहेत व २१ पदे रिक्त आहेत. तांत्रिक पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत ही वस्तुस्थिती आहे असे समितीस सांगितले.

समितीने स्टाफिंग पॅटर्नच्या संदर्भात पाठपुरावा करण्यात आलेला आहे काय ? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी स्टाफिंग पॅटर्नच्या संदर्भात गत महिन्यात नगरविकास विभागाच्या सचिवांशी चर्चा केली होती. स्टाफिंग पॅटर्नच्या संदर्भात सन २००६ पासून महानगरपालिकेने पाठपुरावा करीत आहोत. तसेच शासनाला वेळोवेळी सेवा प्रवेश सूची पाठवली आहे. जळगाव महानगरपालिकेचा आस्थापनावरील खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त असल्यामुळे स्टाफिंग पॅटर्नला मान्यता मिळाली नसून हा निर्णय शासन पातळीवर प्रलंबित आहे. असे समितीस सांगितले.

समितीने शहरातील साफसफाई राखण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. साफसफाई करण्यासाठी एखादा ठेकेदार नेमून त्यांच्यामार्फत शहराची स्वच्छता करावी, यादृष्टीने महानगरपालिका प्रयत्न करणार आहे काय ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महानगरपालिकेने ४५० सफाई कामगार कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने घेतलेले आहेत. स्थायी समितीच्या बैठकीमध्ये १३ प्रभाग निश्चित करून कॉन्ट्रॅक्ट दिलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने या सफाई कामगारांना हातमोजे देण्यात येतात का? जे सफाई कामगारांचे कॉन्ट्रॅक्ट घेतात, त्यांनी कामगारांच्या आरोग्याची काळजी घेणे गरजेचे आहे. ते या नियमांचे पालन करतात की नाही, हे पाहण्याची जबाबदारी निश्चितपणे महानगरपालिकेची आहे. अशी सूचना केली असता आयुक्तांनी १३ प्रभागांमध्ये कॉन्ट्रॅक्ट देण्याचा करार झालेला आहे. यापूर्वीही सफाई कामगारांना हातमोजे देण्यात आलेले आहेत. शहरात भूमिगत गटारे नसून उघड्यांवरील गटारे आहेत. भूमिगत गटारे असतील तर हा प्रश्न उपस्थित होतो. असे समितीस सांगितले.



समितीने महानगरपालिकेत ३० टक्के महिलांचा समावेश असला पाहिजे. सदर पदे भरण्याची कार्यवाही कोणाकडून केली जाते ? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी स्टाफिंग पॅटर्नला मंजुरी मिळाल्यानंतर महिलांची रिक्त पदे भरण्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्यात येईल. सन २००६ मध्ये १०३ पदांचा अनुशेष भरण्याबाबत जाहिरात दिली होती. त्यानंतर सन २०१२ मध्ये पदे भरण्याबाबत जाहिरात दिली. या व्यतिरिक्त जवळपास ५० ते ६० महिलांची पदे अनुकंपा तत्त्वावर भरली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने १०३ पदे महिलांच्या ३० टक्के आरक्षणानुसार भरली आहेत का ? त्या अनुषंगाने नोंदवही ठेवली आहे का ? अशी विचारणा केली असता आयुक्तांनी अनुकंपा तत्त्वावर महिलांची पदे भरली आहेत. १०३ पदांमध्ये समांतर आरक्षणाची २४ पदे आहेत. १०३ पदांच्या जाहिरातीमध्ये समांतर आरक्षण ठेवण्यात आले होते, त्याप्रमाणे पदे भरली आहेत. महानगरपालिकेचा खर्च ३५ टक्के वर आणण्यासाठी आणखी काही पदे कमी करण्यात येतील. यासंदर्भात महानगरपालिकेच्या महासभेमध्ये तसा प्रस्ताव मंजूर करून घ्यावा लागेल. सन २००२ मध्ये दिलेल्या जाहिरातीमध्ये महिलांसाठी समांतर आरक्षण असल्यामुळे ते कॅरी फॉरवर्ड होत नाही. ती पदे उपलब्ध नसतील तर त्या पदावर समांतर आरक्षणांतर्गत पुरुष वर्ग भरला जातो. रिक्त पदे नवीन पॅटर्ननुसार तयार झाली आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने स्टाफिंग पॅटर्न तयार करून तो शासनाकडे पाठवायला हवा होता. त्यामुळे महिलांची पदे भरण्यास विलंब झालेला आहे. अशी विचारणा केली असता आयुक्तांनी यापुढे रिक्त पदांचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात येईल. सन १९९७ मध्ये जेव्हा नोकरभरती झाली तेव्हा नगरपालिकांसाठी संचालनालय होते. सन १९९७-१९९८ मध्ये १,४०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती झाल्यामुळे जास्तीचा कर्मचारी वर्ग निर्माण झाला. या प्रकरणाची चौकशी सुरू आहे. चौकशी समितीचा अहवाल आल्यानंतर शासनाकडे रिक्त पदांबाबतचा स्टाफिंग पॅटर्न पाठविणार आहोत. तसेच १०३ पदांच्या जाहिरातीमध्ये समांतर आरक्षण ठेवण्यात आले होते, त्याप्रमाणे पदे भरली आहेत. महानगरपालिकेचा खर्च ३५ टक्के वर आणण्यासाठी आणखी काही पदे कमी करण्यात येतील. यासंदर्भात महानगरपालिकेच्या महासभेमध्ये तसा प्रस्ताव आणून तो मंजूर करून घ्यावा लागेल. सन २००३ पासून ते आतापर्यंत अशा प्रकारचा अहवाल शासनाला पाठविला नाही. यासंबंधी संबंधितांकडून खुलासा घेऊन जबाबदारी निश्चत करून अहवाल समितीला पाठवू. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

जळगाव, महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त पदे राहण्याचे कारण काय आहे ? शासन निर्णयानुसार महिलांची ३० टक्के पदे भरणे आवश्यक असताना देखील महिलांची भरती न करता जाणीवपूर्वक पुरुष उमेदवारांची भरती केल्या प्रकरणी अधिकाऱ्यांची चौकशी केली आहे काय? त्या अनुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महानगरपालिकेची एकूण मंजूर पदे २,६३६ असून सध्या कार्यरत पदे २,०३७ आहेत. महिलांकरिता ६११ पदे राखीव असून त्यापैकी ४२८ महिला कार्यरत आहेत. १८३ महिला कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. आकृतिबंध मंजुरीची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. महानगरपालिकेचा प्रशासकीय खर्च ५२.८५ टक्के आहे. तसेच सन १९९७-९८ नंतर २०११ मध्ये मागासवर्गीय अनुशेषाची १०३ पदे

भरण्यात आली. महिलांकरिता समांतर आरक्षण ठेवण्यात आले. ७२ पुरुष व २२ महिला असे एकूण ९४ पदे भरता येतात. सन १९९७-९८ नंतर कोणतीही भरती झालेली नाही. भरती बाबत अनियमितता झालेली असून संचालक, लेखा व कोषागारे यांना विशेष लेखापरिक्षणाबाबत लिहिले आहे. सन १९९७-१९९८ मध्ये १४०० पदे भरण्यात आली होती. त्यामध्ये अनियमितता झाली असून लेखापरीक्षणानंतर संबंधितांवर त्या बाबतची कारवाई केली जाईल. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार कार्यवाही केली जात नाही. त्या जागेवर पुरुष उमेदवार नियुक्त केले जातात.अशी विचारणा केली असता आयुक्तांनी या बाबत आम्ही फौजदारी गुन्हे दाखल करणार आहोत. विशेष लेखापरीक्षण केले जाणार आहे. हे प्रकरण आताच निदर्शनास आले आहे असे समितीस सांगितले.

समितीने परिचारिकांची ११ पदे रिक्त आहेत. सदर प्रकरणाबाबत कडक कारवाई केली गेली पाहिजे. किती कालावधीमध्ये कारवाई केली जाईल ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी शासनाने दिलेल्या सूचनेनुसार निश्चित केलेल्या प्रक्रियेची अंमलबजावणी न करता पदे भरण्यात आली. पदे भरण्यापूर्वी जाहिरात दयावी लागते. लेखी व तोंडी परिक्षेचे टक्के ठरविण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेने सादर केलेल्या माहितीनुसार अशाप्रकारे कोणत्याही पद्धतीचा अवलंब करण्यात आलेला नाही. नगरसेवकांची एक समिती तयार करून ही पदे भरण्यात आली. ही निश्चितच नियमबाह्य बाब आहे. या बाबत विशेष लेखापरीक्षण अहवाल सुरू असून हा अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल. ही कारवाई महानगरपालिकेला करावयाची आहे. सन २००३ पासूनचे रेकॉर्ड गहाळ आहे. लेखापरीक्षणातही हेच निष्पन्न झालेले आहे की, यामध्ये नियमबाहय भरती केलेली आहे. गुन्हे दाखल करण्याकरिता लेखापरीक्षणाची आवश्यकता आहे असे समितीस सांगितले.

समितीने जळगाव महानगरपालिका सन २००३ मध्ये स्थापन झालेली असून सदर महानगरपालिकेच्या स्टाफिंग पॅटर्न बाबतचा प्रस्ताव कधी प्राप्त झाला ? यावर शासनाने कोणती कार्यवाही केली ? या प्रकरणी चौकशी पूर्ण झाली आहे काय? यामध्ये काय आढळून आले ? सदरचा स्टाफिंग पॅटर्न मंजूर केला असल्यास त्याप्रमाणे ३० टक्के आरक्षणानुसार महिलांची भरती केली आहे काय ? जुन्या रेकॉर्डचा शोध लागला आहे काय? नसल्यास या प्रकरणी एफआयआर दाखल केला आहे काय ? नियमबाहय भरतीबाबत कोणती कारवाई केली जाणार आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी दोषिंविरूद्ध एफआयआरची कारवाई करावी लागेल. संपूर्ण चौकशी झाल्यानंतर गुन्हे दाखल करण्यात येतील. लेखा परीक्षणाच्या माध्यमातून माहिती प्राप्त झाल्यानंतर २ महिन्यांनी गुन्हे दाखल करण्यात येतील. सन २००३ पासूनचे रेकॉर्ड गहाळ आहे. त्यानंतर विशेष लेखापरीक्षणाकरिता संचालक लेखा व कोषागारे यांना पत्र लिहिलेले आहे. लेखापरीक्षणातही हेच निष्पन्न झालेले आहे की, यामध्ये नियमबाहय भरती केलेली आहे. गुन्हे दाखल करण्याकरिता लेखापरीक्षणची आवश्यकता आहे. असे समितीस सांगितले.



समितीने महानगरपालिकेकडे किती डॉक्टर्स आहेत ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी एम.बी.बी.एस. ४, डी.एम.एस. १, डी.ए.एम.एस. ९, मानधन तत्त्वावर कंत्राटी पद्धतीने ४ डॉक्टर्स आहेत. स्त्री वैद्यकीय अधिकारी ९, पुरुष वैद्यकीय अधिकारी ५ आहेत असे १४ अधिकारी आहेत. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :**

समितीने जळगाव, महानगरपालिकेच्या सेवेत असलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांची एकूण संख्या किती आहे ? त्यापैकी महिला अधिकारी व कर्मचारी यांची संख्या किती आहे आणि शासन निर्णयानुसार महिलांकरिता ३० टक्के राखीव जागा आरक्षित ठेऊन त्यांची भरती करण्याबाबत नोंदवही ठेवण्यात आली किंवा कसे? याबाबत विचारणा केली असता, आयुक्त महानगरपालिका यांनी असे सांगितले की, महानगरपालिकेत वर्ग-१ ते वर्ग-४ मधील एकूण मंजूर पदसंख्या २६३४ असून त्यापैकी २,३०८ पदे भरली आहेत. सद्यःस्थितीत ३२६ पदे रिक्त आहेत. एकूण अधिकाऱ्यांची संख्या ९७ असून त्यापैकी ८ अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत. एकूण महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३७७ इतकी आहे. महिलांकरिता ३० टक्के राखीव जागा आरक्षित ठेवण्यात येत आहेत. महानगरपालिकेची आकृतिबंध व सेवाप्रवेश नियमावली शासनाकडे मंजुरीकरिता पाठविली असून त्यास अद्याप मंजुरी मिळालेली नाही. शासन नियमानुसार महिलांसाठी समांतर आरक्षण ठेवण्यात येते. महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांकरिता स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात आलेली नाही. सेवाप्रवेश नियमावली व आकृतिबंध मंजूर झाल्यानंतर स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात येईल. महिला अधिकारी व कर्मचारी यांची भरती व सेवा विषयक बाबी हाताळण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला नाही. तथापि, शासनाकडून आदेश व सूचना पारित झाल्यास स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात येईल. समितीने भेटीचे वेळी आयुक्त, महानगरपालिका यांची साक्ष घेतली असता साक्षीच्या वेळी आयुक्तांनी महानगरपालिकेतील एकूण ३२६ पदे रिक्त असल्याचे मान्य केले.

तसेच तांत्रिक पदांमध्ये वर्ग-१ व वर्ग-२ ची एकही महिला अधिकारी उपलब्ध नाही. वर्ग-३ मध्ये ८९ अधिकाऱ्यांपैकी ८ महिला अधिकारी कार्यरत आहेत. वर्ग-३ मध्ये एकूण कर्मचाऱ्यांची संख्या ६७३ असून त्यापैकी ५७ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. वर्ग-४ मध्ये १५४५ कर्मचारी असून त्यापैकी महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३२० आहे. वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे पूर्वी भरण्यात आलेली आहेत. तांत्रिक वर्ग-१ मध्ये ५ पैकी एक पद रिक्त आहे. वर्ग-२ मध्ये १ पद रिक्त असून वर्ग-३ मध्ये ३७ पदे रिक्त आहेत व वर्ग-४ मध्ये ९० पदे रिक्त आहेत. तांत्रिक पदांमध्ये वर्ग-१ मध्ये दोनही पदे रिक्त आहेत. वर्ग-३ मध्ये ५३८ पैकी १७५ पदे रिक्त आहेत. वर्ग-४ मध्ये १२२ पैकी २१ पदे रिक्त आहेत. तांत्रिक पदांमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असल्याची वस्तुस्थिती आयुक्तांनी मान्य करून सदरची पदे भरण्यासंदर्भात तसेच आकृतिबंध मंजूर करण्यासंदर्भात विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सांगून जळगाव, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च ३५ टक्के पेक्षा जास्त असल्यामुळे स्टाफिंग पॅटर्नला मान्यता मिळाली नसून हा निर्णय शासन पातळीवर प्रलंबित असल्याचे समितीला सांगण्यात आले.

उपरोक्त माहितीच्या आधारे समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली. विभागीय साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांना महानगरपालिकेमध्ये मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त राहण्याची कारणे काय आहेत ? शासन निर्णयानुसार महिलांची ३० टक्के पदे भरणे आवश्यक असतानादेखील महिलांची भरती न करता जाणीवपूर्वक पुरुषांची भरती केल्याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई केली किंवा कसे ? अशी विचारणा केली असता विभागीय सचिवांनी २६३६ मंजूर पदांपैकी २०३७ पदे भरली आहेत त्यापैकी ६११ पदे महिलांसाठी रिक्त असून १८३ महिला कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत. आकृतिबंध मंजुरीची कार्यवाही शासन स्तरावर सुरू आहे. महानगरपालिकेचा प्रशासकीय खर्च ५२.८५ इतका आहे. तसेच मागासवर्ग अनुशेषाची १०३ पदे भरण्यात आली आहेत. महिलांकरिता समांतर आरक्षण ठेवण्यात आले आहे. त्यात ७२ पुरुष व २२ महिला अशी एकूण २४ पदे भरता येतात. सन १९९७-९८ नंतर कोणतीही भरती झाली नाही. भरतीबाबत अनियमितता झालेली असून संचालक, लेखा व कोषागारे यांना विशेष लेखा परिक्षण करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. सन १९९७-९८ मध्ये १४०० पदे भरण्यात आलेली होती. त्यामध्ये अनियमितता झालेली असून लेखा परिक्षणानंतर त्या बाबतची कार्यवाही केली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

समितीने महिला उमेदवारांच्या राखीव जागांवर पुरुष उमेदवारांची नियुक्ती का करण्यात आली ? अशी विचारणा केली असता, त्यावर महानगरपालिकेच्या आयुक्तांनी याबाबत लेखापरिक्षणाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर २ महिन्यांनी गुन्हे दाखल करण्यात येतील. सन २००३ पासूनचे रेकॉर्ड गहाळ झालेले आहे. त्यानंतर विशेष लेखा परिक्षणाकरिता संचालक, लेखा व कोषागारे यांना पत्राद्वारे कळविण्यात आलेले आहे. सदरच्या भरती प्रक्रियेत अनियमितता झाल्याची बाब नुकतीच उघडकीस आली असून विशेष लेखा परिक्षणाचा संचालक, लेखा व कोषागारे यांच्याकडून भरती प्रकरणी अनियमिततेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येईल असेही समितीस सांगण्यात आले.

उपरोक्त माहिती विचारात घेता जळगाव, महानगरपालिकेमध्ये अनेक पदे रिक्त असून जी पदे भरलेली आहेत ती शासन धोरणानुसार महिलांकरिता आरक्षित असलेली ३० टक्के नियमाचे काटेकोरपणे पालन करून भरण्यात आलेली नाहीत असे समितीला आढळून आलेले आहे. सन १९९७-९८ या वर्षांत भरती करताना सुमारे १४०० पदे भरण्यात आलेली असून त्यामध्ये अनियमितता झाली असल्याचेदेखील विभागीय सचिवांनी मान्य केले आहे. या भरती संदर्भात विशेष लेखा परिक्षणाचा संचालक, लेखा व कोषागारे यांच्याकडून भरती प्रकरणी अनियमिततेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्यात येईल असे समितीला आश्वासीत केले. तसेच या भरती संदर्भातील सन २००३ पासूनचे रेकॉर्ड गहाळ झाले असल्याचेदेखील लेखा परिक्षणात निष्पन्न झाले असल्यामुळे या प्रकरणाची चौकशी सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी समितीला साक्षीच्या वेळी सांगितले.



शासनाच्या निर्णयानुसार महिलांकरिता ३० टक्के आरक्षण भरणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे आता वाढती लोकसंख्या व महानगरपालिकेतील कामाचे स्वरुप विचारात घेता महानगरपालिकेने शासनाकडे आकृतिबंध मान्य करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे व सदरहू प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याचे तसेच हे आकृतिबंध मान्य झाले नसल्यामुळे महिलांकरिता ३० टक्के आरक्षणासाठी नोंदवही ठेवण्याची बाब व सेवा विषयक नियम करण्याची बाब प्रलंबित आहे. **समितीने जळगाव महानगरपालिकेला दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी भेट दिली होती आणि त्यानंतर समितीने विभागीय सचिवांची साक्ष दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी आयोजित केली होती. सुमारे दोन वर्षांचा कालावधी उलटूनही समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे कर्मचारी भरती प्रक्रियेत विशेष लेखा परिक्षणाचा संचालक, लेखा व कोषागारे यांच्याकडून भरती प्रकरणी अनियमिततेबाबतचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करून कारवाई करण्याबाबतचा अहवाल समितीला पाठविण्यात आलेला नाही. यावरुनच सदर भरती प्रक्रियेच्या अनियमिततेबाबत महानगरपालिकेचे प्रशासन किती संवेदनशील व गांभीर्याने घेत आहे हे दिसून येत आहे. समितीला आश्वासीत करूनही चौकशीचा अहवाल न पाठविणे ही अत्यंत गंभीर बाब असल्याचे समितीचे मत आहे. सबब, या प्रकरणी तीन महिन्यात संचालक, लेखा व कोषागारे यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण करून भरती प्रकरणी अनियमिततेबाबतचा अहवाल प्राप्त करून घेऊन दोषीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचे विरुद्ध कठोर कारवाई करून त्याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**त्याचप्रमाणे जळगाव, महानगरपालिकेत शासन निर्णयानुसार महिलांसाठी ३० टक्के आरक्षित जागा भरल्या गेल्या नाहीत या वास्तविकतेला अनुसरुन ज्या सर्व संबंधित जबाबदार अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी यात दुर्लक्ष केले आहे त्या सर्वांची चौकशी करून त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच भविष्यात महानगरपालिकेतील विविध जागांची भरती करावयाची असल्यास शासन निर्णयाचे काटेकोरपणे पालन करून महिलांकरिता राखीव असलेल्या ३० टक्के जागा आरक्षित ठेवण्याबाबत कोणत्याही परिस्थितीत शासन निर्णयाच्या आरक्षणाची पूर्तता करण्यात यावी त्याचप्रमाणे या महानगरपालिकेतील स्टाफिंग पॅटर्नचा प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्यामुळे सदरचा प्रस्ताव शासनाने तातडीने निकाली काढावा तसेच या महानगरपालिकेचा प्रशासकीय खर्च ५२.८५ असल्याचे सांगण्यात आले तोदेखील कमी करण्याबाबत महानगरपालिकेने उपाययोजना करावी आणि समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे या सर्व प्रकरणात तातडीने कारवाई करण्यासंदर्भात विभागाने कठोरपणे पावले उचलावीत अशी समितीची शिफारस आहे.**

**१.२ जळगाव, महानगरपालिकेमध्ये महिलांसाठी शौचालये :—**

जळगाव, महानगरपालिकेमध्ये महिलांकरीता शौचालयाची एकूण संख्या किती ? महात्मा फुले मार्केटमध्ये शौचालयाच्या जागेवर गाळे बांधण्यात आले हे खरे आहे काय ? अशी विचारणा करण्यात आली.

**जळगाव, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :—**

जळगाव महानगरपालिकेला दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने फुले मार्केटमध्ये महिलांसाठी शौचालयाची सोय नाही. फुले मार्केटमधील महिलांच्या शौचालयावर गाळे काढण्यात आलेले आहेत. महिलांसाठी एकंदर किती स्वच्छतागृहे आहेत ? महिला स्वच्छतागृहाचा आढावा घेतला जातो काय ? अशी विचारणा करण्यात आली.

महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी महिलांसाठी स्वच्छतागृहाच्या एकंदर १००० सिट्स आहेत. तसेच एकूण स्वच्छतागृहाच्या ५० टक्के शौचालये महिलांसाठी आहेत. महिलांसाठी १६ सॅनेटरी आहेत. महिला स्वच्छतागृहाचा आढावा नेहमी घेतला जातो. पुरुषांसाठी जेवढी स्वच्छतागृहे असतात तेवढीच स्वच्छतागृहे महिलांसाठी असतात. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

जळगाव, महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जळगाव महानगरपालिकेमध्ये महिलांकरिता सार्वजनिक शौचालयाची एकूण संख्या किती आहे, मागणीनुसार ही संख्या पुरेशी आहे काय ? फुले मार्केटमध्ये महिला शौचालयाच्या जागेवर गाळे बांधण्यात आले आहेत तर महिलांच्या शौचालयासाठी कोणती पर्यायी व्यवस्था करण्यात आली आहे ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी काही शौचालयाचे गाळयांमध्ये रुपांतर करण्यात आलेले आहे. महात्मा फुले मार्केटमध्ये लोअर लेव्हलवर स्त्री आणि पुरुषांसाठी एक शौचालय असून ते पे अॅन्ड युज या तत्त्वावर वापरण्यास दिलेले आहे. पहिल्या मजल्यावरील तीन स्वच्छतागृहांपैकी दोन स्वच्छतागृहे वापरात असून एका स्वच्छतागृहाचे सन २००० मध्ये गाळयामध्ये रुपांतर करण्यात आले आहे. बेकायदेशीरपणे गाळयामध्ये रुपांतर केले म्हणून संबंधितांना नोटीस देऊन त्याबाबत सुनावणी घेतलेली आहे. तत्कालीन नगरपालिकेने अशाप्रकारचे रुपांतर करण्यासाठी ठराव केला होता. तो ठराव विखंडन करून त्याबाबतची पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी यांच्यामार्फत सुरू आहे. त्या गाळयाचे रुपांतर पुन्हा शौचालयामध्ये करण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने महानगरपालिका ही कारवाई केव्हा करणार ? आदेश काय दिले आहेत ? शौचालयाचे काम किती दिवसांत करून घेणार आहात ? जे कोणी अधिकारी असतील त्यांच्यावर कोणती कारवाई केली. शौचालय तोडून गाळे करावे असा ठराव ते कसा करू शकतात ? अशी विचारणा केली असता यावर आयुक्तांनी या संदर्भात सुनावणी झालेली आहे. महानगरपालिकेने आदेश पारीत केलेले आहेत. तत्कालीन नगरपालिकेचा ठराव होता. त्या ठरावाचे विखंडन करून घ्यावे लागणार आहे. त्या ठरावाचे विखंडन झाल्यानंतर पुढील कारवाई तीन-चार महिन्यात करण्यात येईल. सदर काम पुढील दोन महिन्यात होईल. सन २००० मध्ये नगरपालिकेमध्ये तसा ठराव झाला होता. नगरपालिकेने नियमाच्या विरूद्ध ठराव केला असेल तर तो ठराव विखंडन करण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना आहे. तशाप्रकारची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांकडून अपेक्षित असते. या साक्षीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांना एक महिन्यात निर्णय घेण्याबाबत कळविण्यात येईल. असे समितीस सांगितले.



**अभिप्राय व शिफारशी** :

जळगाव महानगरपालिकेमध्ये महिलांकरिता शौचालयांची एकूण संख्या किती आहे? तसेच महात्मा फुले मार्केटमध्ये शौचालयांच्या जागेवर गाळे बांधण्यात आले आहेत हे खरे आहे काय? यावर जळगाव, महानगरपालिकेच्या आयुक्तांनी समितीला असे सांगितले की, महात्मा फुले मार्केटमध्ये महिलांसाठी शौचालयांची सोय नाही. उक्त मार्केटमधील महिलांच्या शौचालयांवर गाळे काढण्यात आलेले आहेत. महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी महिलांसाठी स्वच्छतागृहांच्या एकूण १००० सिटस् आहेत तसेच एकूण स्वच्छता गृहांच्या ५० टक्के शौचालये महिलांसाठी आहेत, महिलांसाठी १६ सॅनेटरी असून, महिला स्वच्छतागृहांचा नेहमी आढावा घेतला जातो, पुरुषांसाठी जेवढी स्वच्छतागृहे आहेत तेवढीच स्वच्छतागृहे महिलांसाठी देखील असल्याचे समितीस सांगण्यात आले. उपरोक्त माहिती विचारात घेता विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समिती याबाबत अधिक माहिती जाणून घेत असता जळगाव, महानगरपालिकेतील शौचालयांच्या स्थितीबाबत विचारणा केली असता महात्मा फुले मार्केटमध्ये पोटमाळ्यावर (लोअर लेव्हल) स्त्री आणि पुरुषांसाठी एक शौचालय असून ते पे अॅण्ड यूज या तत्त्वावर वापरण्यास दिले आहे. पहिल्या मजल्यावरील ३ स्वच्छतागृहांपैकी २ स्वच्छतागृहे वापरण्यात येत असून एका स्वच्छतागृहाचे सन २००० मध्ये गाळयात रुपांतर करण्यात आले आहे. बेकायदेशीरपणे गाळयात रुपांतर केले म्हणून त्याबाबत सुनावणी घेतलेली आहे. तत्कालीन नगरपालिकेचा ठराव असल्यामुळे त्या ठरावाचे जिल्हाधिकाऱ्यांकडून विखंडन करून घ्यावे लागणार असून सदरहू कार्यवाही पुढील ३-४ महिन्यात करण्यात येईल असे समितीला सांगण्यात आले.

उपरोक्त माहिती विचारात घेता महात्मा फुले मार्केटमधील महिलांच्या शौचालयांवर गाळे बांधून सदरचे गाळे वापरात असल्यामुळे महिलांच्या शौचालयाचा वापर असे गाळे बांधून उभारल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. सदरचा ठराव नगरपालिकेने केला होता त्याच्या विखंडनाची कार्यवाही जिल्हाधिकाऱ्यांमार्फत करून घ्यावी लागणार असून ती एक महिन्यात करून घेण्यात येईल असे समितीस साक्षीच्या वेळी आश्वासीत केले होते. जळगाव शहराची लोकसंख्या विचारात घेता पुरुषाप्रमाणेच महिलाही मार्केटमध्ये अथवा शहरात विविध कामासाठी ये-जा करीत असतात त्यासाठी शहराच्या दर्शनीय भागामध्ये महिलांसाठी शौचालये असणे आवश्यक आहे असे समितीचे मत आहे. महात्मा फुले मार्केटमध्ये जी जागा महिलांच्या शौचालयांसाठी होती त्या जागेवर नगरपालिकेने गाळे उभारण्याचा ठराव केला ही अत्यंत खेदाची बाब आहे. **विभागीय साक्षीच्या वेळी समितीला आश्वासीत केल्याप्रमाणे सदरच्या ठरावाचे विखंडन जिल्हाधिकाऱ्यांकडून एक महिन्याच्या आत करण्यात येईल असे सांगूनदेखील त्याबाबतची कार्यवाही केली किंवा कसे याची अद्यापपर्यंत माहिती समितीला पाठविण्यात आलेली नाही. त्यामुळे याबाबत प्रशासनाच्या भूमिकेसंदर्भात समिती अत्यंत खेद व्यक्त करते. या पुढील काळात जळगाव शहरात महिलांसाठी शौचालये उभारताना ती सुसज्ज अशी निर्माण करण्याबाबत योग्य ती उपाययोजना महानगरपालिकेने करावी तसेच महात्मा फुले मार्केटमधील शौचालयाचे रुपांतर गाळयात केल्याप्रकरणी ठरावाचे जिल्हाधिकाऱ्यांकडून विखंडन तात्काळ करून घेऊन त्या ठिकाणी महिलांकरिता शौचालये उभारण्यात यावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला एक महिन्यात पाठविण्यात यावी.**

### १.३ जळगाव, महानगरपालिका क्षेत्रातील अंगणवाड्या :—

महानगरपालिका क्षेत्रात किती अंगणवाड्या सुरू आहेत? त्यापैकी, खाजगी जागेत व महानगरपालिकेच्या जागेत किती अंगणवाड्या आहेत? सदरच्या अंगणवाड्या महानगरपालिकेच्या जागेत सुरू करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे? अशी विचारणा करण्यात आली.

**जळगाव, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :-**

जळगाव महानगरपालिकेला दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने कार्यशाळेसाठी रुपये ५० हजार खर्च कसा काय झाला आहे ? अंगणवाडयांच्या इमारतींसाठी खर्च करणे आवश्यक असताना त्या ठिकाणी खर्च न करता करमणूकीसाठी मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात आलेला आहे अशी विचारणा केली.

आयुक्तांनी एकंदर २२ अंगणवाडयांमध्ये ८७८ विद्यार्थी असून यासाठी रुपये ९.८ लक्ष खर्च झालेला आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

जळगाव, महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महानगरपालिका क्षेत्रात एकूण किती अंगणवाड्या सुरू आहेत? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी अंगणवाड्या अद्ययावत करण्याबाबत ४० अंगणवाड्यांच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी १ कोटी ७९ लाख ७६ हजार रुपयांचा निधी मंजूर आहे. त्यापैकी १५ अंगणवाड्यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत. ९ अंगणवाड्यांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सद्य:स्थितीत दोन अंगणवाड्यांचे बांधकाम सुरू आहे. ४ अंगणवाड्यांचे बांधकाम जागेअभावी होऊ शकले नाही. पुढील आठवड्यात जागा निश्चितीची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. ४० अंगणवाड्यांपैकी २५ अंगणवाड्यांच्या निविदेची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. जाहीर निविदा करून ती स्थायी समितीकडे मान्यतेसाठी पाठविण्यात आली आहे. स्थायी समितीने हा विषय प्रलंबित ठेवलेला आहे. स्थायी समितीने हा विषय ९० दिवसांत मंजूर केला नाही. तर महानगरपालिका अधिनियमानुसार तो विषय मंजूर समजण्यात येतो. त्याप्रमाणे ९० दिवस पूर्ण झाल्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्याची वर्कऑर्डर देऊ. तेव्हा जाहीर निविदेची प्रक्रिया होत होती. ती आता पूर्ण होऊन आताच स्थायी समितीकडे पाठविण्यात आली आहे. समितीच्या साक्षीच्या वेळी जाहीर निविदेची प्रक्रिया अपूर्ण होती. ती आता पूर्ण झाली असून स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. अगोदर सांगितल्याप्रमाणे कार्यादेश दिलेल्या अंगणवाड्यांचे बांधकाम सुरू होते उर्वरित अंगणवाड्याच्या बांधकामाची जाहीर निविदा प्रक्रिया होणे बाकी होते. त्यानंतर जाहीर निविदा झाल्या. या महिन्यात मुदत संपल्यानंतर, स्थायी समितीने मान्यता दिली नाही तरी शासनाची मान्यता घेऊन कार्यादेश मंजूर करू असे समितीस सांगितले.



**अभिप्राय व शिफारशी** :

समितीने जळगाव महानगरपालिका क्षेत्रात किती अंगणवाड्या सुरू आहेत? त्यापैकी खाजगी जागेत व महानगरपालिकेच्या जागेत किती आहेत? सदरच्या अंगणवाड्या खाजगी जागेत असल्यास त्या महानगरपालिकेच्या जागेवर सुरू करण्याबाबत शासनाची काय भूमिका आहे? तसेच अंगणवाड्यांच्या इमारतीसाठी खर्च न करता कार्यशाळेसाठी व करमणुकीसाठी सुमारे ५०,००० रुपये खर्च करण्यात आला असून यावर मोठ्या प्रमाणात खर्च कसा करण्यात आला इत्यादीबाबत विचारणा केली असता आयुक्त, जळगाव महानगरपालिका यांनी समितीस असे सांगितले की, एकंदर २२ अंगणवाड्यांमध्ये ८७८ विद्यार्थी असून यासाठी रुपये ९.८ लक्ष खर्च करण्यात आलेला आहे. विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी याबाबत विभागीय सचिवांना पुन्हा विचारणा केली असता ४० अंगणवाड्यांच्या बांधकामास मंजुरी देण्यात आली असून त्यासाठी १ कोटी ७९ लाख ८६ हजार रुपयांचा निधी मंजूर आहे. त्यापैकी १५ अंगणवाड्यांना कार्यादेश देण्यात आलेले आहेत, ९ अंगणवाड्यांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे सद्य:स्थितीत २ अंगणवाड्यांचे बांधकाम सुरू असून, ४ अंगणवाड्यांचे बांधकाम जागेअभावी होऊ शकलेले नाही. या ४ अंगणवाड्यांसाठी जागा निश्चितीची कार्यवाही पुढील आठवड्यात पूर्ण करण्यात येईल. ४० अंगणवाड्यांपैकी २५ अंगणवाड्यांच्या निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन त्यांची जाहीर निविदा काढून पुढील प्रस्ताव स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविला असून तो प्रलंबित आहे. स्थायी समितीने सदर विषय ९० दिवसांत मंजूर न केल्यास महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतुदीनुसार सदरचा विषय मंजूर झाल्याचे समजण्यात येते. त्यानंतर शासनाकडे प्रस्ताव पाठवून कामाचे कार्यादेश देण्यात येतात. समितीच्या साक्षीच्या वेळी जाहीर निविदेची प्रक्रिया अपूर्ण होती आता ती पूर्ण झाली आहे.

उपरोक्त माहिती विचारात घेता आयुक्त, महानगरपालिका यांनी भेटीच्या वेळी दिलेली माहिती व विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी दिलेली माहिती यात मोठ्या प्रमाणावर तफावत आहे. भेटीच्या वेळी दिलेली माहिती परिपूर्ण नसल्यामुळे समितीला नेमक्या निष्कर्षापर्यंत जाता आले नाही. अंगणवाड्यांचे मोठ्या प्रमाणावरील बांधकाम प्रलंबित असल्यामुळेच आयुक्तांनी जाणीवपूर्वक समितीला वस्तुस्थितीदर्शक माहिती सादर केली नाही असे समितीचे मत आहे. एकूण ४० अंगणवाड्यांपैकी २५ अंगणवाड्यांची निविदा प्रक्रिया भेटीच्या वेळी पूर्ण झाली होती. त्याचप्रमाणे ४ अंगणवाड्यांचे बांधकाम जागेअभावी अपूर्ण होते. याबाबतचा संपूर्ण अहवाल विभागीय सचिवांची साक्ष झाल्यानंतर समितीला पाठविणे आवश्यक होते. तथापि, विभागाने याबाबतचा अहवाल समितीला पाठविला नसल्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या अंगणवाड्यांच्या बांधकामाची माहिती समितीला प्राप्त न झाल्यामुळे स्थायी समितीने निर्णय घेतला किंवा कसे तसेच तसा निर्णय घेतला नसल्यास महानगरपालिकेने पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी शासनाकडे शासनाच्या मंजुरीसाठी प्रस्ताव पाठविला किंवा कसे याची समितीला माहिती प्राप्त झाली नाही. यावरुन विभागीय सचिव तसेच महानगरपालिकेचे आयुक्त या प्रकरणी किती गांभीर्याने घेतात हे दिसून येते. समितीला भेटीच्या वेळी अनेक सन्माननीय महिला नगरसेविकांनी अंगणवाड्यांच्या बांधकाम व दुरुस्ती संदर्भात तसेच अंगणवाड्या घरांमध्ये भरल्या जातात, अनेक ठिकाणच्या अंगणवाड्यांची छते

गळकी आहेत, अधिकारी ऐकत नाहीत अशा तक्रारी केल्या या तक्रारीत तथ्य असल्याचे विभागाच्या तसेच महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांच्या वागणुकीवरुन समितीला दिसून येते. नगरपालिकेच्या नगरसेविका यादेखील लोकप्रतिनिधी असल्यामुळे त्यांच्या सनदशीर मागणीला शासनाने सकारात्मक प्रतिसाद देणे आवश्यक आहे. **तथापि, या प्रकरणी शासनाच्या अधिकाऱ्यांनी तसेच महानगरपालिकेच्या आयुक्तांनी महानगरपालिकेतील अंगणवाड्यांच्या बांधकामासंदर्भात सर्वंकष माहिती समितीला सादर न केल्यामुळे नगरसेविकांच्या तक्रारीत तथ्य असल्याचे समिती मानते व याबाबत तीव्र खेद व्यक्त करते. जळगाव महानगरपालिकेतील अंगणवाड्यांच्या बांधकामासंदर्भात समितीला विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सांगितल्यानुसार २५ अंगणवाड्यांच्या बांधकामाच्या निविदा प्रक्रियेबाबतची स्थिती तसेच त्यानंतर स्थायी समितीने प्रस्ताव मान्य केला किंवा कसे व त्यानंतर ९० दिवसांनंतर महानगरपालिकेच्या प्रशासनाने सदरचा प्रस्ताव शासनास पाठविला किंवा कसे याबाबतचा सर्वंकष चौकशी अहवाल समितीस पाठविण्यात यावा. अद्यापही या निविदेप्रक्रियेची कार्यवाही पूर्ण झाली नसल्यास अथवा उक्त अंगणवाड्यांचे बांधकाम अपूर्ण असल्यास तसेच शासनाकडून उक्त अंगणवाड्यांच्या बांधकामासाठी प्राप्त झालेला निधी अखर्चित असल्यास शासनाने सर्व संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करून नियमानुसार त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीस एक महिन्यात पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

**१.४ जळगाव, महानगरपालिकेचे अंदाजपत्रक व महिलांसाठी सोयी सवलती :—**

महानगरपालिकेचे गत ३ वर्षांतील वर्षनिहाय अंदाजपत्रक किती रक्कमेचे आहे? महसूली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बाल कल्याण विभागासाठी खर्च करण्यात आला आहे? जळगाव महानगरपालिकेचे उत्पन्न वाढविण्याकरिता काय उपाययोजना केल्याआहेत? महानगरपालिकेमार्फत आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना देण्यात येणाऱ्या सोयी सवलती त्यावर झालेला वर्ष निहाय व योजना निहाय एकूण खर्च किती? आर्थिकदृष्ट्या मागास महिलां उद्योजकांसाठी विशेष सोयी सवलती देण्यात येतात काय? महिलांच्या आरोग्याबाबत महानगरपालिकेमार्फत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात? महानगरपालिकेच्या अखत्यारित किती रुग्णालय आहेत? त्यामध्ये ३० टक्के महिलां अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे काय? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी जळगाव, महानगरपालिकेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—**

**(अ) जळगाव शहर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक**

| वर्ष | म.न.पा.चे अंदाजपत्रकिय तरतूद | म.न.पा.चे प्रत्यक्ष उत्पन्न |
|---|---|---|
| २००८-०९ | रुपये २,५३,९४,१४,४२४ | रुपये १,०४,४६,४७,२५१ |
| २००९-१० | रुपये २,९२,५३,४९,८३६ | रुपये १,११,२१,२२,०७३ |
| २०१०-११ | रुपये ५,२९,६०,५५,२१३ | रुपये १,२८,२४,४०,९८० |



**(ब) जळगाव शहर महानगरपालिकेचे अंदाजपत्रक**

| वर्ष | आस्थापना खर्च व महसुली खर्च | आस्थापना व महसुली खर्च वजा जाता अंदाजपत्रकीय रक्कम | महिला व बालकल्याण निधी तरतूद | महिला व बालकल्याण खर्च |
|---|---|---|---|---|
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| २००८-०९ | ७५,११,६५,६८२ | २९,३४,८१,५६९ | ५०,००,००० | १४,९५,०७९ |
| २००९-१० | ९२,०६,२४,५११ | १९,१४,९७,५६२ | ५०,००,००० | ४,११,०६८ |
| २०१०-११ | ८५,५६,१५,३३९ | ४२,६८,२५,६४१ | १,००,००,००० | ३,२४,९२४ |

**महिला व बालकल्याण विभागामार्फत सन २०११-१२ या आर्थिक वर्षांत खालीलप्रमाणे कार्यक्रम राबविण्यात आलेले आहेत :—**

| | | |
|---|---|---|
| १. | बेसिक ब्युटी पार्लर | ५० महिला लाभार्थी |
| २. | प्रोफेशनल ब्युटी पार्लर | ५० महिला लाभार्थी. |
| ३. | व्यक्तीमहत्त्व विकास | ५० महिला लाभार्थी. |
| ४. | पंजाबी ड्रेस व ब्लाऊज तयार करणे | ५० महिला लाभार्थी. |
| ५. | रेडिमेड गारमेंन्ट तयार करणे | ५० महिला लाभार्थी. |
| ६. | वेफर्स व फरसाण तयार करणे | ५० महिला लाभार्थी. |
| ७. | इमिटेशन ज्वेलरी | ५० महिला लाभार्थी. |
| ८. | डि.टी.पी. | ५० महिला लाभार्थी. |
| ९. | दूध व दुग्धजन्य पदार्थ तयार करणे | ५० महिला लाभार्थी. |
| १०. | जरदेशी वर्क | ५० महिला लाभार्थी. |

अशा एकुण ५०० महिलांना लाभार्थींना व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

**सन २००८-०९ :- रुपये १४,९५,०७९**

प्रौढ महिलांसाठी माध्यमिक शाळेमार्फत प्रौढ शिक्षण वर्ग चालविणे, प्रशिक्षकांना मानघन देणे, किट देणे, उदघाटन करणे इत्यादी कामासाठी व महिलांना प्रशिक्षणांसाठी जाहिरात देणे. बालवाडीतील मुलांना ड्रेस, मौजे, बुट इत्यादी साहित्य पुरविणे. कौटुंबिक हिंसाचारांअंतर्गत पिडीत महिलांना कायदेशीर सल्ला देणे. बीपीएल महिलांना प्रशिक्षण देणे, प्रशिक्षकांना मानधन, स्टेशनरी व साहित्य पुरविणे, बालवाडीतील बालकांना पोषण आहार पुरविणे.

**सन २००९-१० :- रुपये ४,११,०६८**

महिलांना संघटित करून अखिल भारतीय स्थानिक संस्था, मुंबई यांचेमार्फत व्याख्यान आयोजित करण्यात आले. १८ वर्षे वयोगटातील मुलींना रूबिला लस देण्यात आल्या.

**सन २०१०-११ :- रुपये ३,२४,९२४**

मकरसंक्रांती निमित्त हळदी कुंकवाचा कार्यक्रम तसेच इंग्रजी शिक्षिका व केअरटेकर यांना मानधन देण्यात आले.

| वर्ष | म.न.पा.चे प्रत्यक्ष उत्पन्न | महिलांसाठी झालेला खर्च | महिला व बालकल्याण निधी तरतूद | प्रत्यक्ष उत्पन्नाशी खर्चाची टक्केवारी | तरतुदीशी खर्चाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | रुपये | रुपये | रुपये | | |
| २००८-०९ | १,०४,४६,४७,२५१ | १४,९५,०७९ | ५०,००,००० | ०.१४ | २९.०९ |
| २००९-१० | १,११,२१,२२,०७३ | ४, ११,०६८ | ५०,००,००० | ०.०३६ | ८.२२ |
| २०१०-११ | १,२८,२४,४०,९८० | ३,२४,९२४ | १,००,००,००० | ०.०२५ | ३.२४ |

जळगाव महानगरपालिका सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत गरजु महिलांना उद्योग धंदे उभारणे, व्यवसाय वृद्धीसाठी बँकेमार्फत कर्ज व अनुदानाचा लाभ देण्यात येतो. मंजूर केलेल्या कर्जाच्या रकमेवर शासन निकषानुसार ३५ टक्के अनुदान देण्यात येते. गरजु महिलांना योजनेअंतर्गत प्रशिक्षणाचा लाभ दिला जातो व तज्ञ व्यक्तीमार्फत माहिती देण्यात येते.

महिलांच्या कल्याणाकरिता राबविण्यात येणाऱ्या सोई सवलतीसाठी शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त नाही. महिलांच्या आरोग्याबाबत खालीलप्रमाणे कल्याणकारी योजना राबविण्यात येतात :—

१. किशोरवयीन तरूणींसाठी Adooloescent Clinic मध्ये त्यांच्या आरोग्य समस्यांवर समुपदेशन आठवड्यातून एकदा गरुवारी.

२. किशोरवयीन मुलींची Hemoglobin तपासणी व त्यावर मोफत उपचार.

३. महिलांची प्रसुती पुर्व तपासणी, औषधोपचार, लसीकरण व प्रसुती.

४. प्रसुती संबंधित गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया उदा. सिझेरिन.

५. जननी सुरक्षा योजना SC, ST संवर्ग गीपीएल धारकांना नैसर्गिक रुग्णालयीन प्रसुतीसाठी रु.६०० चा धनादेश आणि सिझेरियन असेल तर रू. १५०० मात्रचा धनादेश प्रदान करण्यात येतो. घरी प्रसुती झालेल्या लाभींना रु ५०० चा धनादेश देण्यात येतो.



६. कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया मोफत करण्यात येतात शिवाय मोफत औषधी देण्यात येतात तसेच शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना बी.पी.एल.धारक व एस.सी., एस.टी. संवर्गासाठी रु. ६०० मात्र व इतरांना रु. २५० अनुदान देण्यात येते.

७. कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेत गुंतागंत झाली तर ICICI Lombard योजनेचा लाभ देण्यात येतो.

८. प्रसुती प्रश्चात महिलेची तपासणी व उपचार.

९. स्त्री रोग तज्ज्ञांकडून महिलांची तपासणी.

१०. शहरात पी. सी.पी .एन.डी.टी. अधिनियम कायद्याअंतर्गत मुलींची संख्या वाढविण्यासाठी आणि स्त्री गर्भभृण हत्या प्रतिबंधासाठी अंमलबजावणी.

११. शासनाकडून वेळीवेळी येणाऱ्या मार्गदर्शक सूचना तसेच योजनांचा लाभ दिला जातो.

**जळगाव, महानगरपालिकेच्या आयुक्तांची साक्ष :**

जळगाव महानगरपालिकेला दिनांक २२ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी आयुक्तांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी महानगरपालिकेकडून कोणकोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांना सन २००९ मध्ये योगाचे प्रशिक्षण देण्यात आले होते. महिला अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी केवळ सन २००९ मध्ये योगाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. सन २०१० मध्ये प्रेस मॅनेजमेंट व आहाराच्या संदर्भात शिबिर आयोजित करण्यात आले होते. असे समितीस सांगितले.

समितीने योगाच्या शिबिरासाठी एकंदर किती खर्च करण्यात आला होता? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी योगा शिबिरासाठी एकंदर किती खर्च करण्यात आला. परंतु या विषयाच्या संदर्भात समितीने ज्या सूचना केलेल्या आहेत त्याप्रमाणे वेगवेगळे कार्यक्रम आयोजित केले जातील. तसेच आस्थापना व महसुली खर्च वगळता उर्वरित रक्कमेच्या ५ टक्के तरतूद महिला व बालकल्याणासाठी करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात ती रक्कम खर्च होऊ शकली नाही. काही ठिकाणी खर्च झालेला आहे परंतु ती देयके त्या वर्षांत समाविष्ट केली गेली नसावी. यासंदर्भात संपूर्ण माहिती गोळा करावी लागणार आहे. महिलांसाठी कल्याणकारी योजना राबविणे आवश्यक असतांना काही ठिकाणी सहाय्यक अधिकारी/कर्मचारी, प्रशिक्षण कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे महिला व बालकल्याण निधीसाठी जी तरतूद करण्यात आली होती ती पूर्णपणे खर्च होऊ शकली नाही असे समितीस सांगितले.

समितीने प्रशिक्षणासाठी अधिकारी/कर्मचारी नसल्यामुळे महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी खर्च होऊ शकला नाही. परंतु आपले महसुली व आस्थापना खर्च वगळून एकूण अंदाजपत्रकाच्या ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी खर्च करणे आवश्यक असतांना तो का करण्यात आला नाही ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी तरतूद करण्यात आली होती परंतु रक्कम खर्च होऊ शकली नाही. महिलांच्या कल्याणासाठी सर्व उपक्रम राबविले गेले नसल्यामुळे सदर रक्कम पूर्णपणे खर्च होऊ शकली नाही. परंतु या वर्षीचा खर्च पुढील वर्षी खर्च झाला असेल परंतु तो पुढील वर्षासाठी जमा केला नसल्यामुळे आपल्याला तशा संख्या दिसत आहेत. प्रशिक्षित अधिकारी पाहिजे त्या संख्येने उपलब्ध नव्हते हे सुद्धा रक्कम खर्च न होण्याचे एक महत्वाचे कारण आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-२००९ मध्ये आस्थापना व महसुली खर्च वजा जाता ५ टक्के निधीची तरतूद करणे आवश्यक होते. महानगरपालिकेने १ कोटी ३४ लाख रुपयांपैकी ५० लाख रुपयांची तरतूद केली आणि खर्च फक्त १४ लाख ९५ हजार रुपये केला. उर्वरित निधी कोठे वळता केला आहे? शासन निर्णयाप्रमाणे ५ टक्के निधी महिला व बालकल्याण विभागासाठी खर्च करणे आवश्यक असतांनाही निधीची तरतूद तर केली नाहीच, त्याशिवाय जी तरतूद केली होती तेवढा निधीही खर्च केलेला नाही. शासन निर्णयाप्रमाणे अशा प्रकारच्या निधीची तरतूद करणे स्थानिक स्वराज्य संस्थांवर बंधनकारक आहे. महिला व बालकल्याण विभागासाठी १ कोटी ३४ लाख रुपयांची तरतूद केलेली नाही. हा निधी इतरत्र वळविण्यात आल्यामुळे या प्रकरणाची चौकशी लावली पाहिजे. महिला व बालकल्याणासाठी रुपये १४ लाख खर्च केला आहे. या खर्चाचा ब्रेकअप देण्यात यावा अशी सूचना केली.

आयुक्तांनी अधीक्षकांनी सन २००८ साली ४७ हजार ४०० रुपयांचे प्रेशर कुकर खरेदी करण्यात आलेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने ३० प्रेशर कुकर, ३५ प्रेशर कुकर, ४० प्रेशर कुकर अशाप्रकारे प्रेशर कुकरची खरेदी केली आहे. एकदमच प्रेशर कुकरची खरेदी का केली नाही ? अशी विचारणा केली.

अधीक्षकांनी मुला/मुलींसाठी ४० सायकली खरेदी करण्यात आल्या आहेत. एकूण ८० सायकली विकत घेतल्या असून २० सायकलींसाठी रुपये ४८ हजार खर्च झालेला आहे. तसेच आयुक्तांनी प्रत्येकवेळी रुपये ४७ हजार ४०० याप्रमाणे चारवेळा खरेदी करण्यात आली आहे असे समितीस सांगितले.

समितीने एका वर्षात चार वेळा प्रेशर कुकरची खरेदी केली. हे एकदाच का खरेदी करण्यात आले नाहीत? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी निधीच्या उपलब्धततेनुसार जशी मागणी आली त्याप्रमाणे खरेदी करण्यात आले आहेत. प्रत्येक वेळेस रुपये ४८ हजार खर्च याप्रमाणे चारवेळा सायकलींची खरेदी करण्यात आली आहे. महिलांसाठी ब्लाऊजचे वाटप करण्यात आलेले असून बाल दिनासाठी निधी खर्च करण्यात आलेला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने आस्थापना व महसुली खर्च वजा जाता केवळ ५० लाख रुपयांची महिला व बालकल्याण विभागासाठी तरतूद केली आहे आणि त्यातून केवळ रुपये १४ लाख खर्च केले. उर्वरित रुपये ३५ लाख कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आला ? अशी विचारणा केली.



आयुक्तांनी आस्थापना व महसुली खर्च वजा जाता उर्वरित ५ टक्के निधीची तरतूद करणे क्रमप्राप्त होते, परंतु याप्रमाणे तरतूद केली नाही, असे समितीस सांगितले.

समितीने मुला/मुलींच्या पोषण आहारासाठी रुपये २ लाख ८० हजार खर्च करण्यात आले.रुपये ९ लाख ८० हजार पोषण आहारावर खर्च दाखविला. हे नेमके कशासाठी खर्च केले? दुर्बल घटकातील महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी वकिलांचे पॅनल स्थापन केले आहे का? सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत प्रशिक्षण देण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी दुर्बल घटकातील महिलांचे प्रश्न सोडविण्यासाठी वकिलांचे पॅनल स्थापन केलेले आहे आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी वेगवेगळ्या विषयाचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. महिला सक्षमीकरणासाठी अशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येते. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांच्या कल्याणकारी योजना राबविल्या आहेत काय? महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी जो ५ टक्के खर्च झालेला आहे त्याचे मूल्यमापन करण्याची आवश्यकता आहे अशी सूचना केली.

आयुक्तांनी महिलांच्या सक्षमीकरणासाठी ज्या योजना आहेत, त्यासाठी खर्च केला पाहिजे, परंतु तो केलेला दिसत नाही. ज्या अधिकाऱ्याने यामध्ये अनियमितता केली असेल त्यांच्यावर योग्य ती कारवाई केली जाईल.आर्थिक दुर्बल घटकातील महिलांसाठी राबविण्यात आलेल्या विविध कल्याणकारी योजनांचे मूल्यमापन करण्यात आलेले नाही. यापुढे निश्चितपणे योजनांचे मूल्यमापन करण्याची दक्षता घेऊ. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याण खात्याच्या माजी सभापतींनी आपणास ५ टक्के निधीची तरतूद करावी म्हणून मागणी केली होती तरी देखील महानगरपालिकेने निधी उपलब्ध करून दिला नाही, परंतु केंद्र सरकारकडून आलेला निधी मात्र खर्च करण्यात आलेला आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेच्या माध्यमातून दारिद्र्य रेषेखालील महिलांना लघु-उद्योग उभारण्याकरिता कर्ज देण्याची योजना आहे, परंतु खरोखर त्या महिलांपर्यंत हे कर्ज देण्यात येते काय ? त्यांच्यापर्यंत कर्ज देण्यासाठी कोणत्या घटकांचा वापर करता? अशी विचारणा केली.

समुह संघटक यांनी सुवर्णजयंती शहरी रोजगार योजनेतून दारिद्र्य रेषेखालील महिला बचत गटांना कर्ज दिले जाते. यासाठी समूह संघटक नियुक्त केलेले आहेत. प्रकल्प अधिकारी आणि समूह संघटक हे ठिकाणावर जाऊन भेट देतात आणि त्यांच्या बैठका घेतात. त्यांनी व्यवसाय करावा म्हणून मार्गदर्शन केले जाते व तद्‌नंतर तसा प्रस्ताव महानगरपालिकेकडे येतो. त्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी सी.डी.एस.ची एक समिती असते. या समितीमार्फत प्रस्तावाची छाननी करून सदरचा प्रस्ताव पुढे पाठविला जातो. त्यानंतर उपायुक्तांच्या शिफारसीनुसार संबंधित बँकाकडे प्रस्ताव सादर केला जातो. प्रत्येक वार्डामध्ये समूह संघटक जाऊन महिलांना मार्गदर्शन करतात. झोपडपट्टीत राहणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील महिलांना योग्य प्रकारचे मार्गदर्शन केले जाते. सधन भागात सभापती किंवा नगरसेविका राहात असतील तर तेथे अशा प्रकारे मार्गदर्शन केले जात नाही असे समितीस सांगितले.

समितीने दारिद्रय रेषेखालील झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नगरसेविकांनी समितीकडे तक्रार केली आहे की, त्यांच्या भागात अधिकारी कसलेही मार्गदर्शन करीत नाहीत. या लाभार्थ्यांना मदत करण्यासाठी अंगणवाडी सेविका किंवा मदतनीस यांची मदत घेतली जाते काय ? दारिद्रय रेषेखालील कुटुंबांचे प्रमाण महानगरपालिकेला आणखी कमी करायचे आहे ? अशी विचारणा केली.

त्यावर समुह संघटक यांनी २० ते २५ घरांना मिळून एक ठिकाण तयार केले जाते. तेथे महिलांना एकत्रित बोलावले जाते. राज्य सरकार आणि केंद्र सरकारच्या मार्गदर्शक तत्वानुसार कोणत्या महिलांना घ्यावयाचे हे समूह संघटक ठरवतात. समुह संघटकांना रुपये २ हजार मानधन दिले जाते. दिनांक १ डिसेंबर, १९९७ च्या सर्वेक्षणानुसार १७ हजार ८०३ बी.पी.एल. कुटुंबे होती. त्यानंतर सन २००५-२००६ मध्ये सर्वेक्षण झाले तेव्हा १२ हजार ५५१ बी.पी.एल. कुटुंबांची संख्या होती. ही संख्या नंतर कमी झाली. दारिद्रय रेषेखालील कुटुंबे वर आली. जे समूह संघटक कार्यरत असतात त्यांच्यावर ही जबाबदारी असते. आयुक्तांनी हे प्रमाण कमी करण्यासाठी महानगरपालिकेने समूह संघटक नेमले होते असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

जळगाव, महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने महिलांच्या आरोग्याबाबत महानगरपालिकेतर्फे कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात ? तसेच महानगरपालिकेची रुग्णालये आहेत का व त्यांची अवस्था चांगली आहे का, डॉक्टर, नर्सेस व इतर कर्मचारी वर्ग उपलब्ध आहेत का ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी महानगरपालिकेचे शाहू रुग्णालय म्हणून एक चांगला दवाखाना आहे. शहरातील इन्स्टीटयुशनल डिलीव्हरी होतात. त्यातील इंन्स्टीटयुशनल ५० टक्के डिलीव्हरी महानगरपालिकेच्या दवाखान्यात होतात. चेतनदास रुग्णालय व शाहु महाराज रुग्णालय ही दोन मोठी महानगरपालिकेची रुग्णालये आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने पीसीपीएनडीपीच्या संदर्भात विचारणा केली असता आयुक्तांनी एम.बी.बी.एस. ४, डी.एम.एस. १, डी.ए.एम.एस. ९, मानधन तत्त्वावर कंत्राटी पद्धतीने ४ डॉक्टर्स आहेत. स्त्री वैद्यकीय अधिकारी ९, पुरुष वैद्यकीय अधिकारी ५ आहेत असे १४ अधिकारी आहेत. तसेच पीसीपीएनडीपी सन २००८-२००९ मध्ये महानगरपालिकेकडे नोंदणी केलेली सोनोग्राफी केंद्रे ८० होती. सन २००९-२०१० मध्ये ८० केंद्रे होती. सन २०१२ ते २०१३ मध्ये सोनोग्राफीच्या १७ केंद्रांविरुद्ध कारवाई केलेली असून त्यापैकी न्यायालयात सील करून पाठविलेले सोनोग्राफी केंद्रे ८ आहेत. एकूण कार्यरत केंद्रे ६६ असून विनंतीवरुन बंद केलेले सोनोग्राफी केंद्र १ आहे. असे समितीस सांगितले.

समितीने सोनोग्राफी केंद्रे महानगरपालिकेने जशी सिल केलीत तशी दुसऱ्या बाजूने मुलींची संख्या वाढविण्यासाठी कोणते प्रयत्न करत आहात ? अशी विचारणा केली.



आयुक्तांनी या सन २०१४-१५ साली सोनोग्राफी केंद्रांची संख्या ९४ आहे. बेटी बचाव या मोहिमेमध्ये जळगाव जिल्हा आहे. यामधून जनजागृती करीत आहोत. गणेशोत्सवात सुद्धा प्रत्येक गणेश मंडळाना सूचित केले की, बेटी बचाव चा संदेश द्या. जिल्हाधिका-यांनी पुढाकार घेवून मुलींची संख्या किती असावी याबाबतचा एक बोर्ड असतो त्याचे केंद्र सरकारच्या स्तरावरुन एक मॉडेल म्हणून स्वीकारण्यात आले आहे. तसेच मुलींना प्रशिक्षण देतो, सोनोग्राफी केंद्रांवर प्रत्येक ठिकाणी बॅनर्स लावलेले आहेत. परिचारीका, लिंक वर्कर, आरोग्य सेविका यांच्या सोबत घरोघरी जावून एक ते दोन मुली असलेल्या लाभार्थ्यांचे सर्व्हेक्शन करतो. स्त्रिभ्रूण हत्या होणार नाहीत. यासंदर्भात त्या कुटुंबियांचे कॉन्सिलिंग करतो. असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-२००९ मध्ये आस्थापना व महसूली खर्च वजा जाता ५ टक्के निधीची तरतूद करणे आवश्यक होते. जळगाव महानगरपालिकेने रुपये १,३४,००,००० पैकी रुपये ५०,००,००० ची तरतूद केलेली असतांना खर्च केवळ रुपये १४,९५,००० करण्यात आलेला आहे. उर्वरित निधी कोठे वळविण्यात आलेला आहे? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी जळगाव महानगरपालिकेची आर्थिक स्थिती हलाखीची आहे. या महानगरपालिकेवर अनेक वित्तीय संस्थांचे कर्ज आहे. डीआरटीने हुडको या वित्तीय संस्थेचे १४१ कोटीची ऑर्डर आणखी केलेली आहे. जळगाव जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेशी आज रोजीचे थकित कर्ज रुपये ५० कोटी आहे. इतर देणी ५०-६० कोटी रुपये आहेत. असे ६०० कोटी रुपये कर्ज जळगाव महानगरपालिकेवर आहे. जळगाव महानगरपालिकेचे सरासरी उत्पन्न हे १३५ ते १४५ कोटी रुपये पुढे गेलेले नाही. आस्थापना खर्च ५३ टक्के आहे. एकूण अशा या परिस्थितीत माननीय उच्च न्यायालय, मुंबई यांनी महानगरपालिकेला आदेश केलेले आहेत, त्याप्रमाणे दर महिन्याला रुपये तीन कोटी महानगरपालिकेला हुडकोला नियमितपणे द्यावे लागतात. मा. उच्च न्यायालय, औरंगाबादच्या आदेशाप्रमाणे दर महिन्याला रुपये १ कोटी जेडीसीसी बँकेला द्यावे लागते. रुपये ४ कोटी मासिक खर्च कर्ज हप्त्याकरिता आहे. एकूण सरासरी उत्पन्न मासिक रुपये ९ कोटी अत्यंत अत्यावश्यक खर्च पाणीपुरवठा, वीज, पगार, पेन्शन हे १२ कोटी रुपये आहे. हा जवळपास ३ ते ४ कोटी रुपये एक महसूली तूट येते. येथे ती तूट नाही. त्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांना पगार देखील नियमितपणे देता येत नाही. अशा परिस्थितीत निश्चितपणे जो खर्च करणे अत्यंत आवश्यक आहे, तो केला पाहिजे, असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याण विभागाचा निधी वळविण्याबाबतचा शासन निर्णय नाही. तो निधी वापरला नाही तर तो बजेटचा पैसा कोठे गेला ? महिलांच्या सबलीकरणासाठी जेवढी रक्कम शक्य असेल तेवढी महानगरपालिकांकडून खर्च होईल, असे पहावे. अशी सूचना केली.

आयुक्तांनी बजेटमधील तरतूदी दाखविल्या आहेत. बजेटचा पैसा प्रत्यक्षात त्या त्या वर्षातील पाणी वीज पगार व इतर आवश्यक खर्चाकरिता वापरल्याने शिल्लक राहिले नाही. तसेच विभागीय सचिवांनी एलबीटी बंद झाला असल्यामुळे प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत महानगरपालिका देय ठरणारी रक्कम त्यांना मिळेल, याबाबतचे पालकत्व नगरविकास विभागाने घेतलेले आहे. समितीच्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे आम्ही कार्यवाही करू. असे समितीस सांगितले.

समितीने सायकलींची खरेदी वर्षांतून चार वेळा करण्यात आली आहे. शासन निर्णयानुसार अशा प्रकारे खरेदी करता येते का? प्रेशर कुकर वाटपासाठी आपण कोणते निकष निश्चित केले आहेत? एकाही महानगपालिकेने अद्यापपर्यंत प्रेशर कुकरची योजना केलेली नाही. प्रेशर कुकरच्या वाटपातून महिलांचे सबलीकरण कशा प्रकारे होणार आहे? आपण १६० प्रेशर कुकरचे वाटप केले आहे आणि रुपये १,८९,६०० एवढा खर्च केलेला आहे. एका कुकरची किंमत काय आहे ? प्रेशर कुकर किती लिटरचे होते ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी सन २००८-२००९ मध्ये वाटप करण्यात आले आहे. प्रेशर कुकर, लेडिज सायकल, सिलाई मशिन याबाबत खुलासा केलेला आहे. तसेच विभागीय सचिवांनी एलबीटी बंद झाला असल्यामुळे प्रत्येक महिन्याच्या पाच तारखेपर्यंत महानगरपालिका देय ठरणारी रक्कम त्यांना मिळेल, याबाबतचे पालकत्व नगरविकास विभागाने घेतलेले आहे. समितीच्या सूचनेप्रमाणे निश्चितपणे कार्यवाही करू असे समितीस सांगितले.

समितीने कुकर खरेदीसाठी निविदा काढल्या होत्या का ? महानगरपालिकेने सादर केलेल्या माहितीनुसार एकूण १६० कुकरचे वाटप केले असून एका कुकरची किंमत रूपये ११८५ एवढी आहे. वाटप करण्यात आलेले कुकर किती लिटरचे होते ? कोणत्या कंपनीच्या कुकरची खरेदी करण्यात आली होती ? खरेदीसाठी निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती का ? महिलांना कुकर देण्याची योजना नियमानुसार घेऊ शकता का ? अशी विचारणा केली.

आयुक्तांनी याबाबत अनियमितता झाली आहे. या संपूर्ण खरेदी प्रक्रियेसंदर्भात चौकशी करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती नेमली आहे. आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली मुख्य लेखापरीक्षक व मुख्य लेखा अधिकारी यांची एक समिती गठित करण्यात आली आहे. एक महिन्याच्या आत या संदर्भात कारवाई करू या प्रकरणाची कागदपत्रे देखील उपलब्ध नाहीत. असे समितीस सांगितले.

समितीने कागदपत्रे उपलब्ध न होणे, असा प्रकार यापुढे घडू नये, यासाठी महानगरपालिकेने सर्व कामकाज संगणकीकृत करावे, तातडीने संगणकीकृत कार्यप्रणाली अवलंबावी अशी सूचना केली.

विभागीय सचिवांनी अन्य महानगरपालिकांमध्ये एवढी मेजर अनियमितता झाल्याचे दिसून येत नाही. जाहिरात न देता नगरसेवकांच्या समितीमार्फत भरती करण्यात आली, खरेदी करण्यात आली. परंतु, त्याची कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत. यापुढे संगणकीकृत कामकाज करू असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने जळगाव महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेली लेखी माहिती व त्या आधारे आयुक्त, महानगरपालिका यांनी दिलेल्या साक्षीच्या आधारे शासन निर्णयानुसार महानगरपालिकेच्या एकूण अंदाजपत्रकीय उत्पन्नापैकी ५ टक्के निधी (महसुली व आस्थापना खर्च वगळून) महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी तरतूद केली जाते किंवा कसे? तसेच सदरची तरतूद ही दिनांक ८ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबीसंदर्भात खर्च केली जाते किंवा कसे याबाबत



माहिती घेतली असता समितीला अशी माहिती प्राप्त झाली की, उक्त महानगरपालिकेची सन २००८-०९ या वर्षांतील अंदाजपत्रकीय तरतूद रुपये २५३,९४,१४,४२४ इतकी, सन २००९-१० वर्षांतील अंदाजपत्रकीय तरतूद रुपये रुपये २९२,५३,४९,८३६ इतकी तर सन २०१०-११ या वर्षांतील अंदाजपत्रकीय तरतूद रुपये ५२९,६०,५५,२१३ इतकी होती. या महानगरपालिकेचे उपरोक्त नमूद केलेल्या वर्षांतील प्रत्यक्ष उत्पन्न अनुक्रमे रुपये १०४,४६,४७,२५१ रुपये १११,२१,२२,०७३ आणि रुपये १२८,२४,४०,९८० इतके प्राप्त झाले होते. उपरोक्त नमूद केलेल्या वर्षांतील आस्थापना व महसुली खर्च वगळून शासन निर्णयानुसार ५ टक्के प्रमाणे रक्कम अनुक्रमे रुपये २९,३४,८१,५६९, रुपये १९,१४,९७,५६२ आणि रुपये ४२,६८,२५,६४१ इतकी तरतूद करण्यात आली होती. या ५ टक्के तरतुदीपैकी महिला व बालकल्याण विभागासाठी उपरोक्त नमूद केलेल्या वर्षासाठी अनुक्रमे रुपये ५०,००,०००, रुपये ५०,००,००० आणि रुपये १,००,००,००० इतकी तरतूद करण्यात आली होती व या रकमेपैकी महिला व बाल कल्याण विभागावर करण्यात आलेला खर्च उपरोक्त नमूद केलेल्या वर्षांत अनुक्रमे रुपये १४,९५,०७९, रुपये ४,११,०६८ आणि रुपये ३,२४,९२४ इतकी होती आणि प्रत्यक्ष उत्पन्नाची खर्चाची टक्केवारी सन २००८-०९ या वर्षांत ०.१४ टक्के, सन २००९-१० या वर्षांत ०.०३६ टक्के आणि सन २०१०-११ या वर्षांत ०.०२५ टक्के इतकी करण्यात आली होती.

उपरोक्त माहिती विचारात घेता समितीने महिलांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवून एकूण अंदाजपत्रकीय तरतुदीतील (महसुली व आस्थापना खर्च वगळून) ५ टक्के निधी राखून ठेऊन तो का खर्च करण्यात आला नाही? या समितीच्या प्रश्नावर आयुक्त, महानगरपालिका यांनी महिलांच्या कल्याणासाठी सर्व उपक्रम राबविले गेले नसल्यामुळे सदर रक्कम पूर्णपणे खर्च होऊ शकली नाही. परंतु या वर्षीचा खर्च पुढील वर्षी झाला असेल, परंतु तो पुढील वर्षासाठी जमा केला नसल्यामुळे आपल्याला तशा संख्या दिसत आहेत. प्रशिक्षित अधिकारी पाहिजे त्या संख्येने उपलब्ध नव्हते हेसुद्धा रक्कम खर्च न होण्याचे एक महत्वाचे कारण आहे, असे समितीस सांगितले.

जळगाव, महानगरपालिकेने सन २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या वर्षांत एकूण महानगरपालिकेला प्रत्यक्ष प्राप्त झालेल्या अंदाजपत्रकीय तरतुदीतील (महसुली व आस्थापना खर्च वगळून) शासन निर्णयानुसार महिला व बाल कल्याणाच्या योजना राबविण्यासाठी ५ टक्के निधी राखून ठेऊन उक्त निधी दिनांक ८ नोव्हेंबर २०१० रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या बाबींवर खर्च केलेला नाही ही वस्तुस्थिती आहे. केलेला खर्च हा अत्यंत नगण्य असून उक्त खर्च सन २००८-०९ या वर्षांत ०.१४ टक्के, सन २००९-१० या वर्षांत ०.०३६ टक्के आणि सन २०१०-११ या वर्षांत ०.०२५ टक्के असा आहे. यात कुठेही महानगरपालिकेने ५ टक्के इतका निधी खर्च केल्याचे दिसून येत नाही. सदरचा निधी पुढील वर्षांत खर्च केला किंवा कसे याची माहिती लेखी स्वरूपात तसेच आयुक्तांच्या व विभागीय सचिवांच्या साक्षीतदेखील समितीसमोर आलेले नाही. त्यामुळे शासन निर्णयानुसार ५ टक्के निधी महिलांच्या विविध कल्याणकारी योजनांसाठी खर्च करणे बंधनकारक असताना तो केला नाही हे स्पष्ट आहे. तसेच आयुक्तांनी निधी खर्च न होण्यामागील स्पष्टीकरणदेखील मान्य करण्यासारखे नाही. तसेच सदरचा निधी कोणत्या योजनांवर अथवा

कोणत्या बाबींवर खर्च केला हे स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक असल्यामुळे या प्रकरणी महानगरपालिकेच्या सन २००८-०९, २००९-१० व २०१०-११ या कालावधीत कार्यरत असलेल्या सर्वच वरिष्ठ अधिकाऱ्यांची सर्वंकष चौकशी करण्यात यावी असे समितीचे स्पष्ट मत आहे. उक्त अधिकाऱ्यांनी सदरचा ५ टक्के निधी शासन निर्णयानुसार खर्च केलेला नसल्यामुळे असा नियमबाह्य निधी शासनाच्या निदर्शनास आणला किंवा कसे हेही स्पष्ट होणे आवश्यक आहे त्या अनुषंगाने संबंधित अधिकाऱ्यांनी त्यांच्या कर्तव्यात कसूर केली असल्याचे समितीला वाटते. अशा अधिकाऱ्यांवर कडक स्वरुपाची कारवाई होणे अत्यंत आवश्यक असल्याचे समितीला प्रकर्षाने वाटते.

समितीने महानगरपालिकेला दिलेल्या भेटीच्या अनुषंगाने साक्षीच्या वेळी उपस्थित झालेल्या ५ टक्के तरतूद शासन निर्णयानुसार खर्च न करण्याबाबतच्या मुद्यावर लेखी स्वरूपात पाठविलेल्या माहितीत महिला व बाल कल्याणाच्या योजना राबविण्याबाबत निधीच्या उपलब्धतेनुसार खर्च करण्यात आलेला असल्याचे तसेच महिला व बाल कल्याण समितीच्या सूचनांनुसार दिनांक २८ सप्टेंबर, २०१५ अन्वये सन २००८-०९ ते २०११ या कालावधीत खरेदी केलेल्या साहित्याबाबतची व साहित्य वाटपाबाबतची अनियमितता तपासणीसाठी त्रिसदस्यीय समिती नियुक्त करण्यात आली आहे. समितीच्या अहवालानुसार संबंधितांविरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई एक महिन्यात करण्यात येईल असे नमूद केलेले आहे. यावरुन महानगरपालिका प्रशासन समितीची दिशाभूल करीत असल्याचे दिसून येते. समितीने ५ टक्के निधी खर्च न करण्याबाबतची माहिती विचारुनही ती सादर न करणे आणि साहित्य खरेदीबाबत अनियमिततेसंदर्भात त्रिसदस्यीय समितीची नियुक्ती करून एक प्रकारे समितीच्या मूळ मुद्याला वगळून क्षुल्लक बाब समितीसमोर आणून समितीची दिशाभूल करून सर्व संबंधित जबाबदारी अधिकाऱ्यांची प्रशासन एकप्रकारे पाठराखणच करीत असल्याचे समितीचे मत झाले असून सदरची बाब अतिशय गंभीर आहे. प्रथमदर्शनी आर्थिक अनियमितता झाल्याचे समितीला आढळून येऊनही त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक चौकशी अहवाल समितीसमोर प्रशासनाद्वारे न येणे हे सुप्रशासन व आर्थिक पारदर्शकतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे असून आर्थिक अनियमितता करणाऱ्या सर्व संबंधित अधिकाऱ्यांवर ते कितीही वरिष्ठ दर्जाचे अधिकारी असले तरी त्यांचेवर कठोर कारवाई करण्यात यावी असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**सबब, जळगाव महानगरपालिकेने सन २००८-०९, सन २००९-१० आणि सन २०१०-११ या वर्षांत एकूण अंदाजपत्रकीय तरतुदीमधून (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) ५ टक्के रक्कम महिला व बाल कल्याणाच्या विविध योजना राबविण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असताना व तसे अभिप्रेत असताना आवश्यक त्या निधीची तरतूद करून खर्च न केल्यामुळे सदरच्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्यामुळे या प्रकरणी उपरोक्त नमूद वरील तीनही वर्षाच्या रकमेबाबत आवश्यक ती तरतूद करण्यात आली नाही. तसेच शासन निर्णयानुसार संबंधित योजनांवर तरतूद प्राप्त रक्कम खर्च का करण्यात आली नाही या बाबतची सर्वंकष चौकशी करून सर्व संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



## २. जळगाव, जिल्हापरिषद

### २.१ जळगाव, जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत :-

दिनांक २३ जुलै, २०१४ महिलांचे हक्क व कल्याण समितीने दिलेल्या भेटीच्या वेळी जिल्हापरिषद, जळगाव यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती मागविण्यात आली.

जळगाव जिल्हा परिषदेतील रिक्त पदांचा अनुशेष भरण्याबाबत तसेच महिला उमेदवारासाठी ३० टक्के राखीव असलेली पदे भरण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबली जाते ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी जळगाव, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

जळगाव जिल्हा परिषदेतील वर्ग-१ व वर्ग-२ ची पदे भरण्याची कार्यवाही शासनस्तरावरुन करण्यात येते. तसेच वर्ग ३ व वर्ग ४ ची पदे समांतर आरक्षणाने महिलांसाठी भरण्यात आली आहेत. सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १६ मार्च, १९९९ च्या शासन परिपत्रकानुसार महिला आरक्षण करण्यात येते. महिला व बालविकास विभाग शासन निर्णय दिनांक १ ऑगस्ट, १९९७ व दिनांक २५ मे, २००१ मधील तरतुदीनुसार महिलांना आरक्षण देऊन जिल्हापरिषदेच्या सेवेत समावून घेण्यात येते. जिल्हापरिषद स्तंरावरुन महिला उमेदवारांच्या नियुक्तीबाबत सेवाप्रवेश नियमावली तयार करण्यात आलेली नाही. प्राथमिक व माध्यमिक शिक्षकामधून महिलांसाठी ३० टक्के पदे भरती प्रक्रियेत राखून ठेवण्यात येतात.

आरोग्य विभागाच्या अखत्यारित ७७ प्राथमिक आरोग्य केंद्रे असून ४४२ उप केंद्रे आहेत. १८ आयुर्वेदिक दवाखाने असून १ फिरते पथक आहे. त्यामध्ये सद्य:स्थितीत गट अ चे अधिकारी १४० असून १९ गट ब चे अधिकारी आहेत. एकुण १०८९ कर्मचारी कार्यरत आहेत. त्यापैकी महिला अधिकारी २६ असून महिला कर्मचारी ५८१ आहेत. अशी माहिती प्राप्त झाली.

**जळगाव, जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

जळगाव जिल्हापरिषदेला दिनांक २३ जुलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने शासकीय, निमशासकीय सेवेत महिलांसाठी ३० टक्के आरक्षण शासनाने लागू केले आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेत किती महिला कार्यरत आहेत? जिल्हा परिषदेत एकूण मंजूर पदांची किती संख्या आहे? सध्या जिल्हा परिषदेत रिक्त पदांची सद्य:स्थिती काय आहे? अशी विचारणा केली.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शासनाने महिला आरक्षणाचे धोरण जाहीर केल्यानंतर प्रत्येकवेळेस नोकरभरतीमध्ये ३० टक्के आरक्षण ठेवून भरती केलेली आहे. जिल्हा परिषदेत एकूण १०९७ पदे मंजूर आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने प्रत्येक विभागातंर्गत संवर्गनिहाय आरक्षणामध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले होते काय ? वर्ग-३ च्या २०९४ पदांमध्ये किती पदे रिक्त आहेत ? अशी विचारणा केली.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सन १९९७ नंतरच्या प्रत्येक नोकरभरतीमध्ये महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवून पदांची भरती केलेली आहे. काही संवर्गात पात्र उमेदवार न मिळाल्यामुळे ती पदे रिक्त आहेत. कनिष्ठ अधिकारी-१ पद रिक्त आहे असे समितीस सांगितले.

समितीने पात्र ग्रामसेवक प्राप्त न झाल्यामुळे १२६ जागा रिक्त आहेत अशी माहिती देण्यात आली आहे. ग्रामसेवक मिळत नाही हे म्हणणे चुकीचे आहे. किती तरी महिला ग्रामसेवक जिल्हा परिषदेला मिळू शकतील. अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांनी ९४३ पदांपैकी महिला आरक्षित पद संख्या २३२ आहे. त्यापैकी १०६ महिला ग्रामसेवक मिळाल्या असून १२६ पदे रिक्त आहेत. सन २०१० मध्ये २२ पदांची जाहिरात देण्यात आली होती यामध्ये एक पद महिलाचे होते ते भरले गेले आहे. सन २०११ मध्ये ३८ पदांची जाहिरात देण्यात आली होती त्यामध्ये १६ पैकी १५ महिला प्राप्त झालेल्या असून एक महिलाचे पद रिक्त राहिल्यामुळे त्या ठिकाणी पुरुष उमेदवार घेण्यात आलेला आहे. महिला आरक्षण नव्हते तेव्हाचा अनुशेष दिसून येतो असे समितीस सांगितले.

समितीने परिचरांची पदे सुद्धा रिक्त आहेत. जिल्हा परिषदेला परिचर मिळू शकले नाहीत काय ? परिचराच्या उमेदवारांची पात्रता काय होती ? भरती प्रक्रियेसाठी शासनाकडे किती वेळा प्रस्ताव पाठविण्यात आला होता ? परीक्षा कशी घेतली जाते ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांनी परिचर पदासाठी चौथी पासची अट होती. भरती प्रक्रियेमध्ये उमेदवार न मिळाल्यामुळे पदे रिक्त राहिली आहेत. सन २००८ मध्ये भरती प्रक्रिया नव्हती. सन २०१२ मध्ये एकूण पदाच्या ३ टक्के पदे भरण्याची परवानगी मिळाली होती. सन २०१२ मध्ये दोन पदांची जाहिरात देण्यात आली होती. परंतु मधील काळात भरती प्रक्रिया नसल्यामुळे पदे भरण्यात आली नाहीत. माहे मे महिन्यात कोणती पदे भरावित यासंदर्भात शासनाकडून माहिती येत असते. माहे जून महिन्यामध्ये ३ टक्के पदे भरण्याची परवानगी मिळाली होती. त्यानंतर देखील पदे भरण्याचा प्रस्ताव पाठविलेला आहे. माहे ऑक्टोबर महिन्यामध्ये २४ पदे भरण्याची परवानगी शासनाने दिली होती त्याप्रमाणे भरती प्रक्रिया केली होती. परिचर या पदासाठी एकंदर ३९०० उमेदवारांनी अर्ज भरले होते. परीक्षेतील गुणानुसार उमेदवारांची निवड केली जाते. एकंदर १०० मार्काचा पेपर असतो. समिती पेपर सेट करून परीक्षा रविवारी घेत असते. पेपरमध्ये गणित, मराठी, सामान्य ज्ञान तसेच जिल्ह्याच्या संदर्भातील माहिती विचारली जाते. असे समितीस सांगितले.

समितीने ३९०० उमेदवारांपैकी किती उमेदवार पास झाले ? महिला उमेदवारांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या पदांसाठी स्वतंत्र नोंदवही (रोस्टर) ठेवण्यात आली आहे काय, असल्यास केव्हापासून ? तसेच ती अद्ययावत स्वरूपात आहे काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत? रोस्टरची मागासवर्ग कक्षाकडून तपासणी केली जाते काय ? अशी विचारणा केली.



उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांनी एकंदर २४ पदांची भरती करावयाची होती. २४ पदांपैकी ७ पदे राखीव होती. ७ पदे भरण्यात आली. तसेच प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समांतर आरक्षणाला रोस्टर ठेवले जात नाही. मागासवर्ग कक्षाकडून स्वतंत्र नोंदवहीची (रोस्टरची) तपासणी केल्याशिवाय जाहिरात दिली जात नाही. असे समितीस सांगितले.

समितीने महिला उमेदवारांसाठी राखीव असलेल्या रिक्त पदांबाबत व पदे भरण्याबाबतचा अहवाल सचिव, महिला व बाल विकास विभाग तसेच सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय यांना पाठविण्यात आला आहे काय ? असल्यास गत तीन वर्षांत (सन २००८-२०११) अहवाल केव्हा पाठविण्यात आले आहेत ? अशी विचारणा केली.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रिक्त पदांचा अहवाल दर महिन्याला शासनाकडे पाठविला जातो, परंतु महिला व बालकल्याण विभागाकडे पाठविला जात नाही असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बालकल्याण विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्याच्या किती जागा भरल्या आहेत ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बां.क.) यांनी महिला व बाल कल्याण विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या १९ जागा मंजूर असून ०७ जागा भरलेल्या आहेत. महिला व बाल कल्याण प्रकल्प अधिकाऱ्यांच्या एकंदर १२ जागा रिक्त आहेत. ही पदे शासनस्तरावरुन भरण्यात येतात. सदर पदे भरण्याच्या संदर्भात शासनाला वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :-**

जळगाव जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जळगाव जिल्हा परिषदेमध्ये सीडीपीओ च्या जागा रिक्त आहेत का? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सीडीपीओच्या दोन प्रकारच्या जागा आहेत. वर्ग-१ आणि वर्ग-२ यामध्ये सरळसेवेने आणि पदोन्नतीने जागा भरल्या जातात. सदर पदे नुकतीच ग्रामविकास विभागाकडून वर्ग झाली आहेत. पद स्थापना झालेली आहे, परंतु त्यावर व्यक्ती मिळालेली नाही. वर्ग-१ च्या पदासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविलेले आहे. पदोन्नतीच्या संदर्भात डीपीसीच्या बैठकीमध्ये पदोन्नती देण्याबाबतचा निर्णय अंतिमतः झालेला आहे. सदर पदस्थापना एका महिन्यात होईल. जिल्हा परिषदेमध्ये ग्रामसेवकांची भरती न झाल्यामुळे १२६ जागा रिक्त आहेत. कनिष्ठ अभियंता, स्थापत्य सहाय्यक अभियंता, कनिष्ठ अभियंता यांच्या ५० जागा रिक्त आहेत. परिचारिकेच्या जागेसाठी चौथी पास शैक्षणिक पात्रता होती. असे समितीस सांगितले.

समितीने कनिष्ठ लेखा अधिकारी व वरिष्ठ सहायक लेखा या पदाच्या जाहिरातीच्या वेळी एकूण किती महिला आल्या होत्या व त्यातील किती पात्र झाल्या ? ३४ महिलांनी अर्ज केले होते. त्यातील एका महिलेची भरती करण्यात आली. तेथे किती पदे रिक्त होती? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कनिष्ठ लेखा अधिकारी हे एकच आरक्षणाचे पद होते ते भरलेले आहे. वरिष्ठ सहायक लेखा एक पद होते, या पदाचीही भरती केलेली आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिला व बाल कल्याण विभागाच्या प्रकल्प अधिकाऱ्यांच्या १२ जागा रिक्त असून सदर जागा भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली ? सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद, जळगाव अंतर्गत प्रकल्प अधिकाऱ्यांची १९ पदे मंजूर असून सद्यःस्थितीत ७ पदे भरलेली आहेत व १२ पदे रिक्त आहेत. असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने दिनांक २३ जुलै २०१४ रोजी जळगाव जिल्हा परिषदेला भेट दिली. उक्त भेटीच्या वेळी प्राप्त झालेली लेखी स्वरूपातील माहिती व त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांची साक्ष घेतली असता, जळगाव जिल्हा परिषदेतील महिलांचे आरक्षण शासनाच्या दिनांक १ ऑगस्ट १९९७ व दिनांक २५ मे २००१ रोजीच्या शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतुदीनुसार सरळसेवेत महिलांना ३० टक्के प्रमाणे आरक्षण देऊन सेवेमध्ये सामावून घेतले जाते. या जिल्हा परिषदेत ९४३ ग्रामसेवकांच्या पदांपैकी २३२ पदे महिलांकरिता ३० टक्के आरक्षणानुसार राखीव ठेवण्यात आलेली आहेत. त्यापैकी १२६ पदे रिक्त असून पात्र महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यामुळे सदरची पदे भरण्यात आली नाहीत. सन २०१० मध्ये २२ पदांची जाहिरात देण्यात आली होती. त्यामध्ये १ पद महिलांचे भरले आहे. सन २०११ मध्ये १६ महिलांच्या पदांपैकी १५ पदे भरली असून एका पदावर पुरुष उमेदवाराची नियुक्ती केली आहे. तसेच कनिष्ठ अभियंता २२ पदे, स्थापत्य अभियंता सहाय्यक ३२ पदे, कनिष्ठ सहाय्यकांची ५० पदे, परिचरांच्या पदासाठी चौथी पास उमेदवार उपलब्ध न होणे इत्यादीबाबत समितीला माहिती देण्यात आली. परिचर या २४ पदांसाठी ३९०० उमेदवारांनी अर्ज भरले होते त्यापैकी ७ राखीव पदे भरण्यात आली. समितीने विचारलेल्या भरती प्रक्रियेशी संबंधित कुठलीही माहिती संबंधित अधिकाऱ्याने समाधानकारकरित्या समितीला सांगितली नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेल्या ३ वर्षांतील भरती प्रक्रिया समितीला संशयास्पद वाटते. या प्रकरणांची चौकशी करून १५ दिवसांत समितीकडे चौकशी अहवाल पाठविण्याबाबत समितीने निदेश देऊनही आजपर्यंतदेखील या भरती प्रक्रियेचा चौकशी अहवाल समितीकडे संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठविलेला नाही. यावरूनच या भरती प्रक्रियेचा संशय गडद असून सदरचा चौकशी अहवाल न पाठविणाऱ्या अधिकाऱ्याविरुद्ध कठोर कारवाई करणे अत्यंत आवश्यक आहे. **त्याचप्रमाणे महिला ग्रामसेवकाची २३२ पदे राखीव आहेत. यापैकी केवळ १०६ पदे भरली असून, १२६ पदे पात्र ग्रामसेविका प्राप्त न झाल्यामुळे रिक्त ठेवली असल्याचे समितीला सांगितले. इतक्या मोठ्या प्रमाणावर महिलांची पदे पात्र उमेदवार मिळाले नसल्यामुळे रिक्त ठेवण्यात आली यावर समितीचा विश्वास बसत नाही. कारण ज्याअर्थी २२ पदे भरण्यासाठी ३९०० उमेदवार अर्ज करतात, त्याअर्थी ग्रामसेवक पदासाठीदेखील मोठ्या प्रमाणावर अर्ज आले असल्याची शक्यता नाकारली जाऊ शकत नाही. पात्र महिला उमेदवार मिळत नाहीत ही सबब सांगून शासनाच्या समांतर आरक्षणाचे तत्त्व अंमलात आणून**



**त्यायोगे पुरुष उमेदवारांची भरती करण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. तसेच परिचर या पदासाठी चौथी पास उमेदवार उपलब्ध होत नाहीत अशी सर्व माहिती विचारात घेता या जिल्हा परिषदेत झालेल्या संपूर्ण भरती प्रक्रियेमध्ये समिती शंका उपस्थित करते. तद्वतच जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या सन १९९७ ते आजपर्यंतच्या सर्व भरती प्रक्रियेची चौकशी करण्यात यावी अशी समितीची भूमिका आहे. या भरती प्रक्रियेमध्ये दोष आढळल्यास सर्व संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. त्याचप्रमाणे समितीला सांगितल्यानुसार महिला ग्रामसेविकांची रिक्त असलेली १२६ पदे तातडीने भरण्यासंदर्भात पुनश्चः भरती प्रक्रिया सुरू करून महिला उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी व या प्रकरणी केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**२.२ जळगाव जिल्हापरिषदेमध्ये महिलांसाठी तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्याबाबत**

महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी विशेष कक्ष स्वतंत्ररित्या स्थापन करण्यात आला आहे काय ? महिला अधिकारी व कर्मचारी यांचेवर होत असलेल्या अन्यायाच्या संदर्भातील निवेदने प्राप्त झाली आहे काय ? त्याचे स्वरुप काय आहे ? अशी विचारणा करण्यात आली.

**उपरोक्त प्रकरणी जळगाव, जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :-**

महिला व बालविकास विभाग यांच्या शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर महिला तक्रार निवारण समिती गठित करण्यात आलेली आहे.

सन २०१० मध्ये श्रीमती ज्योती पाटील यांनी डॉ. के. एल. पाटील पशुधन विकास अधिकारी यांचे विरूद्ध लैंगिक छळ व मानसिक त्रास याबाबतची तक्रार केलेली होती. सदर तक्रारीचे निवारण करण्यात आलेले आहे. सन २०१३ मध्ये श्रीमती ज्योती घुले यांनी सरपंच जगदिश केशव पाटील यांचे विरूद्ध मानसिक त्रास याबाबतची तक्रार केलेली होती. सदर तक्रारीबाबत चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे अशी माहिती प्राप्त झाली.

**जळगाव, जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

जळगाव जिल्हापरिषदेला दिनांक २३ जुलै २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने एका अधिकाऱ्यांविरूद्ध एका महिलेने लैंगिक छळाची तक्रार केली आहे. वास्तविक पाहता अशा प्रकारची तक्रार करणाऱ्या महिलांचे नाव उघड करण्यात येऊ नये असा शासन नियम आहे. यामुळे तक्रार करणाऱ्या महिलेची बदनामी होते. समिती यासंबंधीचे कामकाज गोपनीय स्वरूपात करते. यापुढे एखाद्या महिलेने अशा प्रकारची तक्रार केली तर तिचे नाव उघड करण्यात येऊ नये अशी सूचना केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांनी महिलांवर होणाऱ्या अन्यायासंदर्भात तक्रारीचे निवारण करण्यासाठी एक समिती स्थापन केलेली आहे. त्या समितीची उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) अध्यक्षा आहेत. सदरची तक्रार सन २०१० मधील असून तक्रारीचा अहवाल पशुसंवर्धन विभागाकडे पाठविण्यात आला आहे असे समितीस सांगितले.

समितीने श्रीमती ज्योती वासुदेव घुले यांनी सरपंच जगदिश केशव पाटील यांचे विरुद्ध मानसिक त्रास दिल्याची तक्रार केलेली आहे. सदर तक्रार कोणत्या तारखेला केली ? सदरची तक्रार केव्हा निकाली काढली ?अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांनी दिनांक २१ सप्टेंबर २०१० रोजी तक्रार केली आहे. सदरहू तक्रारीची चौकशी करून अहवाल पशुसंवर्धन विभागाकडे पाठविण्यात आला होता. माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये पशुसंवर्धन विभागाकडे कारवाईसाठी प्रकरण पाठविण्यात आले आहे. तक्रारकर्त्या महिलेने उपस्थित केलेल्या मुद्यांची चौकशी करून संबंधितांविरुद्ध कारवाईची शिफारस केलेली आहे. परस्पर शिक्षा न करता दोष सिद्ध होतात की नाही, याची चौकशी करून अहवाल दिला जातो. भुसावळ तालुक्यातील सदर तक्रार असून तेथील समितीकडेच तक्रार वर्ग करण्यात आली होती. श्री.पाटील, सरपंच यांनी त्या महिलेची अब्रु वेशीला टांगेल अशी वर्तणूक केली असून सदर प्रकरणी कारवाई करण्यासाठी पशुसंवर्धन खात्याकडे अहवाल पाठविला आहे. असे समितीस सांगितले.

समितीने महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे निवारण करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक समिती स्थापन करावी व त्या समितीने संबंधितांविरुद्ध शिक्षा प्रस्तावित करावी, असे आदेश विशाखा केसच्या प्रकरणामध्ये माननीय सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. याप्रमाणे या प्रकरणात कार्यवाही केली आहे का? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि) यांनी सदरहू अहवालाची प्रत समितीला उपलब्ध करून देण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने श्रीमती ज्योती वासुदेव घुले या महिलेने केलेल्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी चौकशी अधिकारी म्हणून कोणाची नियुक्ती केली होती? अशी विचारणा केली.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी श्री. एस. एन. निकम, महिला सदस्य, कनिष्ठ सहायक, श्री. एस. एन. पाटील, उपाध्यक्ष, विस्तार अधिकारी श्री. के. एन. रावळ अशी या प्रकरणासंदर्भात समिती स्थापन केली होती. या समितीने अहवालामध्ये कोणतेही निष्कर्ष काढलेले नाहीत. यामध्ये दोघांचेही जबाब नोंदविलेले आहेत असे समितीस सांगितले.

समितीने गत ८ वर्षापासून महिलांवर लैंगिक अत्याचार होतात. सदरहू प्रकरणी सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे आवश्यक असतांना कनिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. कनिष्ठ अधिकारी वरिष्ठ अधिकाऱ्याची चौकशी करू शकतो का ? समितीकडे प्रकरण कशासाठी सोपविण्यात आले ? अशी विचारणा केली.

प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक ७ मार्च २०१० रोजी पशुसंवर्धन खात्याला अहवाल पाठविण्यात आलेला आहे. तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांनी शासन निर्णयानुसार संबंधित कार्यालयात समिती स्थापन केलेली आहे. बी.डी.ओ. कार्यालयामध्ये समिती असल्यामुळे त्या कार्यालयात हे प्रकरण वर्ग केलेले आहे. कारवाईसाठी प्रकरण प्रस्तावित केले होते असे समितीस सांगितले.



समितीने भुसावळ तालुक्यातील समितीने काय शिफारस केली आणि जिल्हा परिषदेने कोणती शिफारस केली आहे? सन २०१० पासून तक्रार निवारण समितीच्या महिला अध्यक्षा असून या प्रकरणांमध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई झाली किंवा नाही, हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे ? एखाद्या ठिकाणी महिलांवर लैंगिक अत्याचार झाला असेल तर त्याची वैद्यकीय चाचणी करणे आवश्यक आहे. यशदा, पुणे येथे आपल्याला कशा प्रकारचे प्रशिक्षण देण्यात आले आहे ? या तक्रारीच्या संदर्भात प्रमुख अधिकाऱ्याकडून कोणत्याही प्रकारची कारवाई झालेली नाही. यशदामध्ये कोणते प्रशिक्षण मिळाले होते, हे प्रशिक्षण कधी घेतले होते ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांनी विषय नवीन असल्यामुळे याबाबत अपुरी माहिती आहे. वेळोवेळी यशदा, पुणे येथे या विषयाच्या अनुषंगाने प्रशिक्षण दिले जाते. यशदामध्ये सन २०११-१२ मध्ये ट्रेनिंग घेतले होते. असे समितीस सांगितले.

समितीने सदर तक्रार सन २०१० मधील असून डॉ. पाटील यांना पाठीशी घालण्याचे कारण काय ? या तक्रारीच्या संदर्भात राजकीय दबाव आला होता काय ? डॉ. पाटील सध्या कोठे कार्यरत आहेत? आता त्यांची वागणूक कशी आहे ? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांनी तक्रार निवारण समितीवर कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव आला नाही. तसेच डॉ. पाटील सध्या चोपडा येथे कार्यरत असून आता त्यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. डॉ. पाटील यांच्याविरूद्ध जी तक्रार करण्यात आलेली आहे ती येथे वाचता न येण्यासारखी आहे. याबाबत चौकशी करून कारवाई करण्यात येईल असे समितीस सांगितले.

समितीने दुसरी तक्रार श्री. जगदीश पाटील यांच्या विरोधातील असून त्यासंदर्भात माहिती देण्यात यावी. महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आलेले आहे काय? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.) यांनी सदर तक्रार समितीकडे करण्यात आली नसून मानवी हक्क आयोग, दिल्ली यांच्याकडे सदर तक्रार करण्यात आली होती. दिल्लीवरुन ही तक्रार जिल्हाधिकाऱ्यांकडे आली व तेथून ती समितीकडे आली. " महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आलेले नाही " तसेच उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बां.क.) यांनी महिलांसाठी समुपदेशन केंद्र जिल्हापरिषदेच्या सेस फंडातून सुरू करण्यात यावे अशी सूचना करण्यात आली होती परंतु त्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली नाही. शासनास सुद्धा यासंदर्भात कळविण्यात आले आहे. असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष**

जळगाव जिल्हापरिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ नोव्हेंबर २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जळगाव जिल्हा परिषदेमध्ये एका पशुधन विकास अधिकारी त्यांच्याविरुद्ध महिला पशुधन पर्यवेक्षक या महिला कर्मचाऱ्याने लैंगिक शोषणाचे गंभीर स्वरूपाचे आरोप करून तक्रार दाखल केली होती. सदरची तक्रार दाखल

झाल्यानंतर विशाखा प्रकरणात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेत स्थापन झालेल्या जिल्हास्तरिय समितीमध्ये संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कोणती कारवाई केली ? सरपंचाची चौकशी केलेली आहे काय? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हापरिषदेच्या स्तरावर महिला समितीने चौकशी केली होती. त्यांच्या अहवालानुसार कोणतेही आरोप सिद्ध झालेले नाहीत. ही केस थोडीशी अडचणीची होती. यामध्ये आरोग्य सेविकेने तक्रार केली होती. त्यांची चौकशी जिल्हा परिषदेच्या स्तरावर करण्यात आली होती. सरपंचाची चौकशी अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही. त्यावेळी श्रीमती शितल उगले या मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांनी श्रीमती घुले यांना बोलावून नियमाप्रमाणे तुम्हाला चौकशी करायची असेल तर सर्वप्रथम पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करा असे सांगितले होते. त्यानंतर समिती योग्य ती कारवाई करेल असे समितीस सांगितले.

समितीने सरपंचाच्याविरूद्ध एखाद्या कर्मचाऱ्याची तक्रार जिल्हास्तरीय समितीकडे करता येते काय? विशाखा प्रकरणाच्या अनुषंगाने या समितीचे निकष काय आहेत? सरपंचाविरूद्ध तक्रार विशाखा समितीकडे करता येते काय ? त्या महिलेने थेट पोलीस स्टेशनमध्ये एफआयआर दाखल करणे आवश्यक होते. अशी सूचना केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर महिलेने सरपंचाविरुद्ध तक्रार केली होती. त्यावेळी महिला मुख्य कार्यकारी अधिकारी होत्या. त्यांनी महिलेला बोलावून त्यांना समुपदेशन केले. तुम्ही एफआयआर दाखल करा. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी लेखी स्वरूपात दिले आहे. त्यांनी वैयक्तिक समुपदेशन केलेले आहे. सरपंचावर कारवाई करण्याचे अधिकार समितीला नाहीत. त्यानंतर त्या महिलेने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केलेली नाही. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समुपदेशन केले तसेच ते त्यांच्या पाठीशी असल्यामुळे दबावाची शक्यता नाही. त्या महिलेच्या विनंतीनुसार त्यांची बदली केलेली आहे. जळगाव, जिल्हापरिषद त्याबाबतीत अतिशय संवेदनशील आहे असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने महिला अधिकारी व कर्मचारी यांच्या लैंगिक छळाच्या सतावणुकीच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी जिल्हा परिषदेत स्वतंत्र कक्ष स्थापन केला किंवा कसे? याबाबत लेखी तसेच साक्षीच्या वेळी प्राप्त झालेली माहिती विचारात घेता शासन निर्णयानुसार जिल्हा स्तरावर तक्रार निवारण समिती गठित करण्यात आलेली आहे. उक्त तक्रार निवारण समितीकडे एका कर्मचारी महिलेने डॉ. के. एल. पाटील, पशुधन विकास अधिकारी यांचेविरुद्ध लैंगिक छळ व मानसिक त्रास याबाबतची तक्रार दाखल करण्यात आली होती. सदर तक्रारींचे निवारण करण्यात आलेले आहे. सन २०१३ मध्ये जगदीश केशव पाटील, सरपंच यांचेविरुद्ध एका महिलेने मानसिक त्रास दिल्याबाबतची तक्रार दाखल केली होती. सदर तक्रारीबाबत चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे.



डॉ. के. एल. पाटील, पशु विकास अधिकारी यांचेविरुद्धच्या तक्रारींची चौकशी करून त्याबाबतचा अहवाल पशुसंवर्धन विभागाकडे माहे फेब्रुवारी, २०११ मध्ये कार्यवाहीसाठी पाठविण्यात आला आहे. या प्रकरणामध्ये तक्रारकर्त्या महिलेने उपस्थित केलेल्या मुद्यांची चौकशी करून संबंधितांविरुद्ध पशुसंवर्धन विभागाकडे कारवाई करण्याची शिफारस केली आहे. या प्रकरणात कनिष्ठ सहाय्यक, श्री.एस.एन. पाटील, विस्तार अधिकारी, श्री. के. एन. रावळ या समितीतील सदस्यांनी दोघांचेही जबाब नोंदविलेले आहेत. या समितीने चौकशी अहवालामध्ये कोणतेही निष्कर्ष न काढता चौकशीतील गंभीर बाबीचा विचार करता सदरचा अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पशुसंवर्धन विभागाकडे पाठविलेला आहे.

समितीने या प्रकरणात वरिष्ठ अधिकारी यांचेविरुद्ध आरोप असल्यामुळे त्यांची चौकशी कनिष्ठ कर्मचारी करू शकतात काय? अशी विचारणा केली असता त्यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तक्रारकर्त्यांचे व दोषींचे केवळ जबाब नोंदविले असून पुढील कारवाईसाठी सदरचे प्रकरण पशुसंवर्धन विभागाकडे पाठविण्यात आले आहे असे समितीस विदित केले. या महिलेंच्या तक्रारींमध्ये गंभीर बाबींचा उल्लेख असूनही दोन वर्षांचा कालावधी होऊनदेखील अद्यापपर्यंत विभागाने कोणती कार्यवाही केली याची माहिती समितीला पाठविलेली नाही. या प्रकरणी जिल्हा परिषदेने प्रकरण उचित कार्यवाहीसाठी विभागाकडे पाठविल्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने विशाखा प्रकरणात दिलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे विभागाने या अधिकाऱ्याविरुद्ध कारवाई करून त्याबाबतच्या कारवाईचा अहवाल समितीला पाठविणे आवश्यक होते. तथापि, अद्यापपर्यंत याबाबतचा कार्यवाही अहवाल समितीला पाठविला नसल्यामुळे या दोषी अधिकाऱ्यांना विभागाने पाठीशी घातले असल्याचा दाट संशय समितीला येतो आणि म्हणूनच समिती विभागाच्या या कृतीचा अतिव खेद व्यक्त करते.

दुसऱ्या प्रकरणाबाबत विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, एका महिलेने जगदीश केशव पाटील या सरपंचाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. सदरची तक्रार मानवी हक्क आयोग, दिल्ली यांच्याकडे करण्यात आली होती. दिल्लीवरुन ही तक्रार जिल्हाधिकारी यांच्याकडे आली व तेथून ती महिला तक्रार निवारण समितीकडे आली. सदरच्या प्रकरणाबाबत जिल्हा परिषदेच्या स्तरावर महिला तक्रार निवारण समितीने चौकशी केली होती त्यांच्या अहवालानुसार कोणतेही आरोप सिद्ध होत नाही, ही केस थोडीशी अडचणीची होती, यामध्ये आरोग्य सेविकेने तक्रार केली होती, सरपंचाची तक्रार अद्यापपर्यंत करण्यात आलेली नाही, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती शितल उगले यांनी तक्रारकर्त्या महिलेला बोलावून या प्रकरणी प्रशासन तुमच्या पाठीशी आहे सरपंच विरोधात कारवाई करण्याचे अधिकार समितीला नाहीत. या प्रकरणी चौकशी करायची असेल तर सर्व प्रथम पोलीस स्टेशनमध्ये तक्रार करा त्यानंतर जिल्हा परिषदेची तक्रार निवारण समिती योग्य ती कार्यवाही करेल. तथापि, संबंधित महिलेने पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली नाही आणि संबंधित महिलेच्या विनंतीनुसार तिची बदली करण्यात आली.

कामाच्या ठिकाणी पुरुष अधिकारी कर्मचाऱ्यांकडून महिलांच्या लैंगिक सतावणुकीचे अनेक प्रकार उघड होत असल्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निदेशानुसार राज्य शासनाच्या प्रत्येक शासकीय/ निम शासकीय कार्यालयात " महिला तक्रार निवारण समिती " संबंधित विभागाने स्थापित करणे हे बंधनकारक आहे. या समितीद्वारा केवळ पुरुष अधिकारी कर्मचाऱ्यांचीच चौकशी केली जाते. तथापि, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका इत्यादी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिला अधिकारी/कर्मचारी कार्यरत असतात आणि त्यांचा कामानिमित्त या लोक प्रतिनिधींशी देखील संपर्क येत असतो. या लोक प्रतिनिधींच्या संपर्कातून अधिकारी/कर्मचारी महिलांची लैंगिक सतावणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणात देखील एका सरपंचाद्वारे संबंधित महिलेची लैंगिक छळवणूक झाली असून तीने जिल्हा तक्रार निवारण समितीची कार्यकक्षा समजून घेऊन राष्ट्रीय महिला आयोगाकडे तक्रार दाखल केली. या तक्रारीच्या अनुषंगाने तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संबंधित महिलेला संपूर्ण संरक्षण देण्याची जबाबदारी घेऊनदेखील संबंधित महिलेने पोलीस स्टेशनमध्ये समाजातील बदनामीच्या भीतीने तक्रार दाखल केली नाही.

**कामाच्या ठिकाणी लोकप्रतिनिधीद्वारा होणाऱ्या लैंगिक सतावणुकीची शासन निर्णयात कोणतीही तरतूद नसल्यामुळे सदरची बाब भारतीय दंड विधानसंहितेत गुन्हाच्या स्वरूपातील तरतुदीनुसार फौजदारी प्रक्रिया संहितेद्वारा तक्रार दाखल करण्याची तरतूद असल्यामुळे सहजासहजी अशा तक्रारी दाखल केल्या जात नाहीत. ही बाब विचारात घेता संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या अधिनियमात जसे मुंबई ग्राम पंचायत अधिनियम, महाराष्ट्र नगर परिषदा/नगरपालिका/ महानगरपालिका अधिनियम आणि जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम इत्यादीमध्ये योग्य ती तरतूद करून लोक प्रतिनिधींना महिला अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या लैंगिक सतावणुकीपासून रोखण्यासंदर्भात योग्य ती तरतूद करण्यासंदर्भात उपाययोजना करावी अशीही समितीची शिफारस आहे.**

उपरोक्त दोन्ही प्रकरणातील बाबी विचारात घेता निश्चितच दोन्ही प्रकरणे गंभीर आहेत. या दोन्हीही प्रकरणात संबंधित तक्रारकर्त्या महिलांची नावे प्रशासकीय अधिकाऱ्यांनी उघड केली असल्यामुळे या महिलांची नावे सार्वजनिक झाली आहेत त्यामुळे त्यांची समाजात बदनामीदेखील झाली आहे. समिती याबाबत तीव्र खेद व्यक्त करते. कारण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशानुसार लैंगिक छळाने पीडित झालेल्या महिलेचे नाव सार्वजनिकरित्या उघड करता येत नाही. यामागे संबंधित महिलेची बदनामी होऊ नये हा हेतू असून महिलेचे नाव गुप्त राहिल्यास कार्यालयात पुरुष अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून होत असलेल्या लैंगिक सतावणुकीच्या विरुद्ध अनेक पीडित महिला तक्रार निवारण समितीकडे जाऊन त्यांच्यावर होत असलेल्या लैंगिक सतावणुकीच्या तक्रारी मांडू शकतील. **पीडित महिलेचे नाव सार्वजनिक केल्यास त्यांची समाजात बदनामी होईल या भीतीने पीडित महिला तक्रार करणार नाहीत आणि मुकाट्याने अन्याय सहन करतील अशी समितीला साधार भीती वाटते. सबब, यापुढील काळात पुरुष अधिकारी/कर्मचाऱ्याकडून लैंगिक छळाने पीडित असलेल्या महिलेचे नाव कोणत्याही परिस्थितीत गोपनीय ठेवण्यात यावे व सार्वजनिकरित्या उघड करण्यात येऊ नये यासाठी राज्यातील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालयांना परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात यावे, अशीही समितीची शिफारस आहे.**



त्याचप्रमाणे पशुसंवर्धन विभागाच्या डॉ.के.एल.पाटील यांनी एका महिलेची लैंगिक सतावणूक केली या कारणावरुन जिल्हा परिषदेच्या तक्रार निवारण समितीच्या कनिष्ठ दर्जाच्या कर्मचाऱ्यांनी त्यांचे केवळ जबाब नोंदवून पुढील कार्यवाहीसाठी प्रकरण पशुसंवर्धन विभागाकडे पाठविले ही बाबच मुळात अनाकलनीय आहे. जिल्हा परिषदेने तक्रार निवारण समिती गठित करताना त्यामध्ये वरिष्ठ दर्जाचा पुरुष/ महिला अधिकारी या समितीचा अध्यक्ष नियुक्त करणे अत्यंत आवश्यक आहे आणि अशा वरिष्ठ अधिकाऱ्याने छळवणुकीच्या प्रकरणामध्ये यथायोग्य कार्यवाही करून नियमानुसार कारवाई करून त्यावर विभाग प्रमुखाची संमती घेणे आवश्यक आहे. **या प्रकरणामध्ये या बाबीचे जिल्हा परिषदेने उल्लंघन केले असल्याचे प्रथमदर्शनी समितीला आढळून येते. अद्यापपर्यंत या प्रकरणाची समितीला कुठल्याही प्रकारची माहिती न पाठविणे त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई केली किंवा कसे याची माहिती समितीला न होणे ही दुर्दैवी बाब असून प्रशासनाची दिरंगाई व एकप्रकारे गुन्हेगाराला पाठीशी घालण्याचा प्रकार असल्याचाच समितीला दाट संशय येतो. म्हणून या प्रकरणी ज्या अधिकाऱ्यांनी त्यांच्या स्तरावर कारवाई करण्यास दिरंगाई केली त्यांचेविरुद्ध विभागाने कठोर कारवाई करावी. त्याचप्रमाणे या प्रकरणात अद्यापही कारवाई केली नसल्यास ती तातडीने करून संबंधित प्रकरण निकाली काढण्यात यावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला एका महिन्यात पाठविण्यात यावा, अशीही समितीची शिफारस आहे.**

### २.३ जळगाव, जिल्हा परिषदेचे अंदाजपत्रक व महिलांच्या कल्याणकारी योजना

जिल्हा परिषदेचे गत ३ वर्षातील अंदाजपत्रक किती रकमेचे आहे? उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी किती रक्कम राखून ठेवण्यात आली आहे? महिला अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी कोणत्या कल्याणकारी योजना/उपक्रम राबविले जातात जिल्हापरिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून महिलांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना राबविल्या असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. गत ३ वर्षांत वर्षनिहाय किती रकमेची तरतूद करण्यात आली? वैयक्तिक व सामुहिक विकासांच्या योजना राबविण्यात आल्या आहेत काय? आर्थिकदृष्ट्या मागास महिला उद्योजकांसाठी उद्योगधंदे उभारण्याकरिता विशेष सोयी सवलती देण्यात येतात काय? या योजनाचा जास्तीत जास्त लाभ घेण्यासाठी त्याना प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र योजना आहेत काय? महिलांच्या आरोग्याबाबत कोणत्या कल्याणकारी योजना राबविण्यात येतात? जिल्हापरिषदांच्या अखत्यारित किती रुग्णालये आहेत? आस्थापनेवर ३० टक्के महिलांची नियुक्ती करण्यात आली आहे काय? वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त असल्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना वैद्यकीय सुविधा पुरविण्यामध्ये अडचणी निर्माण होतात. याबाबत आरोग्य संचालनालयाचे म्हणणे काय आहे? जिल्हापरिषदेने त्यांच्या उत्पनातून महिलांच्या विकासासाठी कोणत्या योजना राबविल्या? त्यासाठी वर्षनिहाय किती रकमेची तरतूद करण्यात आली होती? त्याचे लाभार्थी किती आहेत? अशी विचारणा केली.

उपरोक्त प्रकरणी जळगाव जिल्हा परिषदेकडून खालीलप्रमाणे माहिती प्राप्त झाली :—

| अ.क्र. | वर्ष | अंदाज पत्रक मंजूर निधी (महसूली उत्पन्न) | म.मा.बा.क १० टक्के तरतूद |
|---|---|---|---|
| (१) | २००८-२००९ | ४,७५,१६,००० | ८५,४६,००० |
| (२) | २००९-२०१० | ५,०३,६१,००० | ६७,९८,००० |
| (३) | २०१०-२०११ | ४,३८,८५,००० | ६४,२०,००० |

उक्त अंदाजपत्रकातील रकमेपैकी एकूण १० टक्के रक्कम जिल्हा परिषद क्षेत्रातील महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली आहे.

| अ.क्र. | वर्ष | मंजूर रक्कम | खर्च |
|---|---|---|---|
| (१) | २००८-२००९ | ८५,४६,,००० | ६७,८३,००० |
| (२) | २००९-२०१० | ६७,९८,००० | ४७,६७,००० |
| (३) | २०१०-२०११ | ६४,२०,००० | १०,३५,००० |

महिलांचे सबलीकरणासाठी तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी खालीलप्रमाणे योजना राबविण्यात आलेल्या आहेत :—

| अ.क्र. | विभागाचे नाव | योजनेचे नाव |
|---|---|---|
| १ | महिला व बाल कल्याण | महिला व बाल कल्याण समितीमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागासअसलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता जि.प.१० टक्के सेस मधून विविध योजना राबविण्यात येतात.<br>१. पिकोफॉल मशिन पुरविणे<br>२. विवाहभत्ता अनुदान<br>३. विद्यावेतन देणे<br>४. विविध व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे इ. तसेच स्वयंरोजगार अनुदान (व्यक्तिगत) शासन निर्णयातील नमुद विविध साहित्य पुरविणे इ. |
| २ | समाजकल्याण | जि. प अंतर्गत २० टक्के सेस फंडांतून समाजकल्याण विभागांतर्गत मागासवर्गीय महिलांच्या कल्याणासाठी शेवया मशिन, पिकोफॉल मशिन, शिलाई मशिन इत्यादी योजना राबविल्या जातात. |



| अ.क्र | विभाग | वर्ष | योजना | खर्च (लाखांत) |
|---|---|---|---|---|
| १ | समाजकल्याण | २००८-०९ | (१) मागासवर्गीय महिलांना मिनी चक्की पुरविणे | ८.०१ |
| | | | (२) मागासवर्गीय महिलांना शेवयामशिन पुरविणे | ८.९८ |
| | | | (३) मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे. | ८.९८ |
| | | २००९-१० | (१) मागासवर्गीय महिलांना मिनी चक्की पुरविणे | १६.९५ |
| | | | (२) मागासवर्गीय महिलांना शेवयामशिन पुरविणे | ११.९७ |
| | | | (३) मागासवर्गीय महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे. | १६.९३ |
| | | २०१०-११ | (१) मागासवर्गीय महिलांना मिनी चक्की पुरविणे | २५.०० |
| | | | (२) मागासवर्गीय महिलांना शिलाई मशिन पुरविणे | ५.०० |
| २ | जि. ग्रा. वि. यंत्रणा. | २००८-०९ | बचत गटांची संख्या - २८८ | ४६.६६ |
| | | २००९-१० | बचत गटांची संख्या - ४३५ | ११७.५६ |
| | | २०१०-११ | बचत गटांची संख्या - ५८८ | ५२९.५२ |
| ३ | बालकल्याण विभाग. | २००८-०९ | (१) महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे- ६२८ | ४९.९२ |
| | | | (२) मुख्य सेविकांना पुरस्कार - ३ | ०.०४ |
| | | | (३) अंगणवाडी सेविकांना पुरस्कार - १८ | ०.०८ |
| | | | (४) अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक साहित्य पुरविणे | ७.०३ |
| | | | (५) अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक तक्ते पुरविणे | ६.२१ |
| | | | (६) अंगणवाडी केंद्रांना खेळणी पुरविणे | ३.७७ |
| | | २००९-१० | (१) महिलांना पिको फॉल मशिन पुरविणे - ५६० | ४४.५२ |
| | | | (२) मुख्य सेविकांना पुरस्कार - ३ | ०.०५ |
| | | | (३) अंगणवाडी सेविकांना पुरस्कार - १५ | ०.०९ |
| | | | (४) खान्देश महोत्सवाकरिता | ०३.०० |
| | | २०१०-११ | अंगणवाडी केंद्रांना खेळणी पुरविणे | १०.०० |

महिला बचत गटांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत उभारण्यात आलेल्या मार्केटमध्ये स्वत:चा व्यवसाय करण्याकरिता नाममात्र भाड्यांने गाळे देण्यात येतात.

महिला व बाल कल्याण समितीमार्फत महिलांचे सबलीकरण करण्याकरिता तसेच आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या महिलांना सक्षम करण्याकरिता जिल्हा परिषदेकडून १० टक्के सेसमधून विविध योजना राबविण्यात येतात.

१. पिको फॉल मशिन पुरविणे

२. विवाह भत्ता अनुदान

३. विद्या वेतन देणे

४. विविध व्यावसायिक व तांत्रिक प्रशिक्षण देणे इ. तसेच स्वयंरोजगार अनुदान (व्यक्तिगत) शासन निर्णयातील नमुद विविध साहित्य पुरविणे इ.

जिल्हापरिषदे अंतर्गत २० टक्के सेस फंडातून समाजकल्याण विभागांतर्गत मागासवर्गीय महिलांच्या कल्याणासाठी शेवया मशिन, पिको फॉल मशिन, शिलाई मशिन इ. योजना राबविल्या जातात. महिला बचत गटांना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत उभारण्यात आलेल्या मार्केटमध्ये स्वतःचा व्यवसाय करण्याकरिता नाममात्र भाड्याने गाळे देण्यात येतात. समिती ज्यांचे नाव सूचविते त्यांना पिको फॉल मशिन दिली जाते. महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आलेले नाही. जिल्हा सेस अंतर्गत उपलब्ध निधी अत्यल्प असल्याने निधी राखून ठेवण्यात आलेला नाही अशी माहिती प्राप्त झाली.

**(१) बालकल्याण विभाग.—** सदस्य योजनाची प्रभावीपणे अंमलबजावणी होणेसाठी ग्रामसेवक यांचे मार्फत ग्रामपंचायतमध्ये प्रसिद्धी देण्यात येते तसेच पंचायत समिती मासिक सभेत पं.स.सदस्य यांना योजनांची माहिती देण्यात येते व सर्व जि.पि.सदस्यांना योजनांचे अर्ज माहितीस्तव पाठविण्यात येतात.

**(२) जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा.—**महिला बचत गटांसाठी प्रत्येक तालुक्यात दोन विस्तार अधिकारी व दोन गटसमन्वयकांना मार्फत बचत गटांना स्वतःसाठी शाश्वत उपजीविका मिळावी म्हणून गटातील महिलांना आर सेटी प्रशिक्षण केंद्रांमार्फत प्रशिक्षण देऊन स्वतःचा उद्योग करण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येते व त्यांना बँकेमार्फत अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येते.

**(३) आरोग्य विभाग.—**जिल्हा परिषदेमार्फत राबविण्यात येणाऱ्या महिलांच्या कल्याणकारी योजना व सोईसवलती इतरबाबतची माहिती गरजू महिलांपर्यंत पोहचविण्याचे व त्यांनी योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी स्वतंत्र अशी यंत्रणा आरोग्य विभागाकडे नाही. परंतू आरोग्य विभागामार्फत महिलांच्या कल्याणासाठी सावित्रीबाई फुले कन्या योजना राबविण्यासाठी जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राचे आरोग्य कर्मचारी (आशा) यांचेमार्फत प्रोत्साहनपर आरोग्य शिक्षण दिले जाते. तसेच जिल्ह्यातील महिलांसाठी आरोग्य सुविधा तात्काळ उपलब्ध होणेबाबत आरोग्य विभागामार्फत आरोग्य सुविधांबाबत टोल फ्री क्रमांक १०८ हा देण्यात आलेला असून आरोग्य सुविधा पुरविली जाते.



**(४) पशुसंवर्धन विभाग.—**विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत विशेष घटक योजनेमध्ये ३० टक्के महिलांना १० अ १ शेळी गट व दुभत्या जनावरांना पशु खाद्य वाटप करण्यात येते. सदर योजना तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी (वि.) यांचेमार्फत राबविण्यात येते.

| अ.क्र | विभागाचे नांव | योजनेचे नाव | सन २००८-०९ मधील खर्च (लाखांत) | सन २००९-१० मधील खर्च (लाखांत) | सन २०१०-११ मधील खर्च (लाखांत) |
|---|---|---|---|---|---|
| (१) | आरोग्य विभाग. | जननी सुरक्षा योजना. | १२९.९५ | ९६.१५ | १०६.७२ |
| | | कुटुंब कल्याण योजना. | २०२.३० | १६५.६७ | १३०.८० |
| | | आर. आय. | २९.५३ | ४२.२८ | ५४.०० |
| | | आर. ओ. एच. कॅम्प | . . . | . . . | १.८० |
| | | आशा | ११.९१ | १००.७७ | ११२.५४ |
| | | अर्श कार्यक्रम | १०.६२ | ०.२३ | ३.६५ |
| (२) | बालकल्याण विभाग. | | ०.९५ | ०.९५ | १.४७ |
| | | | १.९८ | ०.९९ | ०.०० |
| | | टीसपी-ओटीएसपी- | पिकोफॉल मशिन पुरविण्यात आले. | अंगणवाडी केंद्रासाठी खेळणी पुरविणे. | अंगणवाड्यांना बस्कर पट्टी पुरविणे. |
| | | | ९.९९ | १९.९९ | ९.२३ |
| | | | अंगणवाडी केंद्रांना साहित्य पुरविणे. | अंगणवाडी केंद्रांना बस्कर पट्टी पुरविणे. | अंगणवाडी केंद्रांना खेळणी पुरविणे. |
| | | सर्वसाधारण निधी | ३.५० स्वयंरोजगारासाठी अनुदान. | ०.०६ विद्यावेतन | ०० |
| | | | ०.०८ विवाह भत्ता | ०.०८ विपरह भत्ता | ०० |
| | | | ०.६६ विद्यावेतन | | |

**(१) जननी सुरक्षा योजना :—**

जननी सुरक्षा अंतर्गत १६ आठवड्यांपूर्वी गर्भवती स्त्रीने प्राथमिक आरोग्य केंद्रात नोंदणी करून तपासणी करावी. घरी बाळंतपण झाल्यास रुपये ५०० लाभ, संस्थेतील बाळंतपणास रुपये ७००, शहरी भागातील संस्थेस रुपये ६०० व सिजेरियनसाठी रुपये १,५०० अनुदान देय आहे. सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये १५,५९३ लाभार्थीनां लाभ देण्यात आला आहे.

**(२) कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया :—**

लोकसंख्येला आळा घालण्यासाठी तसेच माता व बालकांचे आरोग्य चांगले राहण्यासाठी यांचा वापर करण्यात येतो. कुटुंबकल्याण पद्धतीच्या योग्य वापरामुळे गर्भपाताचे धोके टाळता येतात. या योजने अंतर्गत सन २०१३-१४ मध्ये एकूण २०,९५४ शस्त्रक्रिया करण्यात आलेल्या आहेत.

**(३) आरोग्य शिबीरे (आर.सी.एच.कॅम्प.) :—**

प्रजनन व बालआरोग्य कार्यक्रमांतर्गत माता व बालकांच्या सर्वांगीण आरोग्याच्या दृष्टीने व गरजेनुसार व त्याच्या सोयीनुसार दर्जेदार आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य शिबिरे सुरू करण्यात आली असून स्त्रिया, मुलांना व वृद्धांना आरोग्य शिक्षण व समुपदेशन करता येत आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सुचनेनुसार जिल्ह्यातील डोंगराळ, मागास, दुर्गम भागातील निवडक प्रा.आ. केंद्रामध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात येत आहे. त्याअंतर्गत रुपये १५,००० अनुदान उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामध्ये रुपये १०,००० ची औषध व इतर कार्यक्रम आयोजनासाठी रुपये ५,००० देण्यात येत आहेत. अशा प्रकारच्या सुविधांमध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ, स्त्री वैद्यकीय अधिकारी, बालरोग तज्ज्ञ, परिचारिका, प्रयोगशाळा तंत्रज्ञ सहभाग घेण्यात येतो. वरील शिबिरामधून कुटुंब नियोजन मासिकपाळी, वैद्यकीय गर्भपात, स्त्रीरोग-विषयक तक्रारी, प्रजनन मार्गाचे आजार इ. बाबींवर आरोग्य सेवा देऊन समुपदेशन केले जाते.

**(४) आशा :—**

आशा ही योजना प्रथम जिल्ह्यातील ३ आदिवासी तालुक्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आलेली होती, त्याअंतर्गत ९० आशा स्वयंसेविकेची नियुक्ती व २१ दिवसांचे प्रशिक्षण आशाना देऊन गावांतील आरोग्य-विषयक अडचणी दूर करण्यात मदत करीत आहे. सदरील ९० आशांची वेगळी ओळख होण्यासाठी साडी, परिचयपत्र झेंडा, बॅग, औषधी किट, बॅनर यांची उपलब्धता करून देण्यात आलेली आहे. सन २००८-०९ मध्ये केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार बिगर आदिवासी भागांमध्ये २,५०४ आशाची निवड करण्यात आली असून २,५९४ आशा कार्यरत आहेत.



**(५) जननी शिशू सुरक्षा कार्यक्रम :—**

सर्व गरोदर मातांना व १ वर्षांच्या आतील नवजात बालकांना मोफत संदर्भसेवा मिळावी यासाठी पुणे येथे २४/७ संपर्क कक्षांची स्थापना करण्यात आली.

(१) माता व बालकांना घरापासून दवाखान्यापर्यंत व रुग्णालयापर्यंत वाहन सेवा मोफत देण्यात येते.

(२) सर्व गरोदर माता व बालकांना आहार, रजिस्ट्रेशन, औषधे, तपासण्या इ. सेवा मोफत दिल्या जातात.

(३) जास्तीत जास्त लोकांनी सेवेचा लाभ घेण्यासाठी टोल फ्री नंबर किंवा फोन लावल्यावर सेवेचा लाभ देण्यात येतो.

(४) कोणतीही महिला शासकीय रुग्णालयात सेवा घेण्यात येत असेल त्यांना वरील सर्व सेवा मोफत देण्यात येतात.

(५) सन २०१३-१४ मध्ये १९,३४७ गरोदर मातांना व ५९८ नवजात बालकांना मोफत संदर्भ सेवा पुरविण्यात आलेली आहे.

**(६) अर्श कार्यक्रम :—**

(१) लैंगिक मार्ग जंतू संसर्ग आरोग्य सेवा देण्यात येतात

(२) गर्भनिरोधक साधानांचा वापरी, समुपदेशन व उपलब्धता

(३) गरोदरपणातील समस्या

(४) मासिक पाळीतील समस्या

(५) शैक्षणिक समस्या

(६) पोषण समुपदेशन

(७) सुरक्षित गर्भपात निदान व संदर्भिय सेवा

(८) इतर समस्या

तसेच सन २०१४-१५ मध्ये जिल्ह्यातील सर्व आरोग्य केंद्रांत व रुग्णालयांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

| विभाग | वर्ष | योजना | तरतूद | खर्च | लाभार्थी |
|---|---|---|---|---|---|
| बालकल्याण विभाग. | २००८-०९ | मुख्य सेविकांना पुरस्कार-३ | ०.०५ | ०.०४ | ३ |
| | | अंगणवाडी सेविकांना पुरस्कार- १८ | ०.०९ | ०.०८ | १८ |
| | | अंगणवाडी केंद्राना शैक्षणिक साहित्य पुरविणे. | ८.७० | ७.०३ | ३१५४ |
| | | अंगणवाडी केंद्रांना शैक्षणिक तक्ते पुरविणे- | ६.२२ | ६.२१ | ३१५४ |
| | | अंगणवाडी केंद्राना खेळणी पुरविणे- | ३.७८ | ३.७७ | ३१५४ |
| | २००९-१० | मुख्य सेविकांना पुरस्कार | ०.०५ | ०.०५ | ३ |
| | | अंगणवाडी सेविकांना पुरस्कार | ०.१० | ०.०९ | १५ |
| | | खान्देश महोत्सवाकरिता | ३.०० | ३.०० | |
| | २०१०-११ | अंगणवाडी केंद्राना खेळणी पुरविणे- | ३८.७२ | १०.०० | ३१.५४ |

अशी माहिती प्राप्त झाली.

**जळगाव, जिल्हापरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :—**

जळगाव जिल्हा परिषदेला दिनांक २३ जूलै, २०१४ रोजी दिलेल्या भेटीच्या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेण्यात आली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेने गत तीन वर्षांतील वर्षनिहाय वार्षिक अंदाजपत्रक किती रकमेचे होते, १० टक्के निधी कोणकोणत्या योजनांवर खर्च करण्यात आला ?

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी सन २००८-०९ मध्ये जिल्हा परिषदेचे महसुली उत्पन्न रुपये ४,७५,१६,००० होते त्यापैकी रुपये ८५,४६,००० महिला व बाल कल्याणासाठी तरतूद करण्यात आली होती, प्रत्यक्षात रुपये ६७,८३,००० खर्च करण्यात आले. सन २००९-१० महसुली उत्पन्न रुपये ५,०३,६१,००० असून महिला व बाल कल्याणासाठी रुपये ६७,९८,००० तरतुद करण्यात आली असून प्रत्यक्षात रुपये ४७,६७,००० खर्च करण्यात आले. सन २०१०-११ मध्ये महसुली उत्पन्न रुपये ४,३८,८५,००० असून महिला व बाल कल्याणासाठी रुपये ६४,२०,००० तरतूद करण्यात आली असून, प्रत्यक्षात रुपये १०,३५,००० खर्च करण्यात आले असे समितीस सांगितले.



समितीने महिलांच्या योजनांसाठी जेवढी तरतूद करण्यात आली होती तेवढी रक्कम खर्च करण्यात आलेली नाही. दर वर्षी अनुशेष शिल्लक ठेवण्यात आलेला आहे. महिलांच्या उन्नतीसाठी १० टक्के निधी खर्च केला असता तर अनुशेष शिल्लक राहिला नसता. सन २०११-१२ चा अनुशेष रुपये २० लाख आहे अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी गत वर्षांचा अनुशेष पुढे एकत्र करून तो खर्च केला जातो. जिल्हा परिषदेकडे किती निधी जमा होईल हे माहिती नसल्यामुळे निधी खर्च करता येत नाही. यापुढे निश्चितपणे दखल घेतली जाईल असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-०९ मध्ये पिको फॉल मशिन्ससाठी किती तरतूद करण्यात आली होती ? विधवा/परित्यक्त्या आणि निराधार महिलांसाठी एकसुद्धा योजना राबविण्यात आलेली नाही. अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी सन २००८-०९ मध्ये पिको फॉल मशिन्ससाठी ५० लक्ष रुपयांची तरतूद करण्यात आली होती. सन २००८-०९ मध्ये ६२८ मशिन्स खरेदी करण्यात आल्या होत्या. समिती ज्यांचे नाव सुचविते त्यांना पिको फॉल मशिन दिली जाते असे समितीस सांगितले.

समितीने महिला अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी जिल्हा परिषदेकडून कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबविल्या जातात? महिलांसाठी किती व्याख्याने व शिबिरे आयोजित केली होती? आरोग्य शिबिरांमध्ये किती महिलांनी भाग घेतला? किती महिलांची आरोग्य तपासणी करण्यात आली? आजाराचे निवारण कशा प्रकारे करण्यात आले? महिलांच्या तपासणीसाठी स्त्रीरोग तज्ज्ञांना बोलावण्यात आले होते काय? आहार व्यवस्थापनाबाबत आरोग्य व्याख्यान किती वेळा देण्यात आले होते? किती खर्च केला? अशी विचारणा केली.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी दर वर्षी दिनांक ७ एप्रिल रोजी जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो. गत दोन वर्षांपासून दिनांक ७ एप्रिल रोजी जिल्हा परिषदेतील सर्व कर्मचाऱ्याची आरोग्य तपासणी केली जाते. जिल्हा परिषदेमध्ये ३११ कर्मचारी असून त्यापैकी २६१ पुरुष व ५७ महिला आहेत. या शिबिरामध्ये स्त्रीरोग तज्ज्ञ उपस्थित नव्हत्या, या आरोग्य तपासणीत बी.पी., शुगर व इतर आजाराची तपासणी करून उपचार केले जातात. आहार व्यवस्थापनाबाबत माहे सप्टेंबर महिन्यात एक व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यासाठी रुपये ४९ लाख ९२ हजार खर्च केले आहेत असे समितीस सांगितले.

समितीने पिको फॉल मशिन कोणाकडून खरेदी करण्यात आले ? पिको फॉल मशिन्स ज्यांच्याकडे शिलाई मशिन होत्या त्यांनाच दिल्या की दुसऱ्यांना दिल्या आहेत ? शासनाच्या निकषाप्रमाणे पिको फॉल मशिन्सचे वाटप करण्यात आले आहे काय? अशी विचारणा केली.

जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पिको फॉल मशिन्ससाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या. महिला व बाल कल्याण खात्यामार्फत लाभार्थ्यांची निवड करण्यात येते. पिको फॉल मशिन्सचे तालुकानिहाय वाटप करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील दारिद्र्य रेषेखालील महिलांना पिको फॉल मशिनचा लाभ देण्यात आला आहे असे समितीस सांगितले.

समितीने जळगाव जिल्ह्यात बी.पी.एल. ची किती लोकसंख्या आहे ? अशी विचारणा केली.

प्रकल्प संचालक यांनी जळगाव जिल्ह्यात २ लाख ६८ हजार लोकसंख्या आहे. यावर्षी पिको फॉल मशिन्ससाठी पुरवठादार निश्चित केलेले आहेत. असे समितीस सांगितले.

समितीने प्रत्येक तालुक्याला किती पिको फॉल मशिन्स दिलेल्या आहेत? तसेच किती लाभार्थ्यांना विवाहभत्ता दिला? महिला लाभार्थ्यांना जे प्रशिक्षण दिले जाते, त्यासाठी त्यांना प्रवास/दैनिक भत्ता देण्यात येतो काय? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी तालुकानिहाय लाभार्थ्यांची यादी आहे. पिको फॉल मशिन्सची किंमत रुपये ७९५० आहे. शासन निर्णयात वस्तूंची यादी दिलेली असून ही यादी महिला व बालकल्याण सभापती निश्चित करतात, त्याप्रमाणे योजना घेत असतो. प्रशिक्षण घेणाऱ्यांना प्रवासाचा खर्च दिला जातो. एमएससीआयटी, ड्रेस मेकिंग, विविध स्वयंपाकाचे पदार्थ इत्यादी संदर्भात शासनाने प्रशिक्षणाची यादी निर्धारित केलेली आहे. पिको फॉल मशिन्ससाठी २४ लाख ९८ हजार रुपयांची तरतूद होती. शासकीय दरकरारानुसार पुरवठादार नेमण्यात आले होते. सन २००९-२०१० मध्ये रुपये ४४ लाख ५२ हजार पिको फॉल मशिन्ससाठी खर्च केलेले आहेत असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-२००९ मध्ये रुपये ६७ लाख ८३ हजार कशावर खर्च केले आहेत? अंगणवाडयांना कोणते साहित्य दिले जाते? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी अंगणवाड्यांसाठी तसेच विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलतींसाठी रुपये ७ लाख खर्च करण्यात आला आहे. अंगणवाडयांना शैक्षणिक साहित्य, खेळणी तसेच पझल गेम्स दिले जातात. महिला व बालकल्याण सभापतींनी ज्या वस्तू देण्याचे ठरविले, त्यानुसार बैठक घेतली जाते व पंचायत स्तरावर मास्टर यादी तयार केली जाते असे समितीस सांगितले.

समितीने आर्थिक दुर्बल घटकातील महिलांना विवाहभत्ता देण्यात येतो काय? महिला व बालकल्याण, महिलांचे सबलीकरण, आर्थिकदृष्टया मागासलेल्या महिलांना सक्षम करण्यासाठी १० टक्के योजना राबविली जाते काय? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी शासनाकडून विवाहभत्यासाठी निधी प्राप्त होत नाही. १० टक्के योजनेमधून विवाह भत्ते, विद्या वेतन हे लाभ दिले जात नाहीत. महिला व बालकल्याण विभाग आणि जिल्हा परिषद अशी एकत्रित माहिती दिलेली आहे. सन २०१०-२०११ मध्ये ९४ लाख ९८ हजार रुपयांची तरतूद केलेली असून तितका खर्चही केलेला आहे. सुत्रानी इंजिनिअर्स यांचेशी दरकरार केलेला असून त्यांच्याकडे मागणी नोंदविलेली आहे. महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची यादी शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आहे. त्यातून कोणत्या योजना राबवायच्या हे महिला व बालकल्याण समितीमार्फत ठरविल्या जाते. सन २०१०-२०११ मध्ये महिला व बालकल्याण विभागासाठी २४ लाख ९८ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली होती, यासंदर्भात शासनाने सन २०१०-२०११ मध्ये दरकरार



निश्चित केला होता. त्या वर्षांत संबंधित पुरवठादाराने पुरवठा केलेला नव्हता म्हणून त्या आर्थिक वर्षांत खर्च झालेला नाही. शासन निर्णयामध्ये वस्तूंची यादी निश्चित करून दिलेली आहे. त्यामधील कोणती वस्तू खरेदी करावयाची, याबाबतचा निर्णय महिला व बालकल्याण समिती घेते असे समितीस सांगितले.

समितीने तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमांतर्गत कोणते विविध उपक्रम/योजना राबविण्यात आल्या आहेत, सदरहू उपक्रम/योजनांमध्ये किती महिलांनी भाग घेतला? अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला सक्षमीकरण कार्यक्रमयोजना जिल्हा परिषदेमध्ये कार्यान्वित नाही. असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हयामध्ये इंदिरा गांधी आवास योजनेअंतर्गत पंचायत समिती क्षेत्रनिहाय किती घरे बांधण्यात आली ? घरांची संयुक्त मालकी पतीपत्नीच्या नावे करण्यात आली काय ? घरकुलाच्या विनियोगासाठी कोणत्या सूचना करण्यात आल्या ? महिला व बालकल्याण समितीसाठी स्वतंत्र व सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे काय ? अशी विचारणा केली.

प्रकल्प संचालक यांनी इंदिरा गांधी आवास योजनेला सन २००६ मध्ये प्रत्यक्ष यादी प्रसिद्ध झाली होती. आजपर्यंत ८८,२८७ घरकुलांचे वाटप करण्यात आलेले आहे. रायगड, नाशिक, नंदूरबार या जिल्हयांमध्ये इंदिरा आवास योजनेतील घरकुलांचे टार्गेट मोठे असते परंतु तशा प्रकारचे टार्गेट या जिल्हयात नाही. जिल्हयामध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत पंचायत समिती क्षेत्रनिहाय सन २०१३-१४ अखेर ८८,९५७ घरकुलांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर योजनेअंतर्गत मंजूर करण्यात आलेली घरकुले महिलांच्या नावे असल्यास त्याची नोंद महिलांच्या नावे करण्यात येते व उर्वरित घरकुले मात्र पती-पत्नीच्या नावे करण्यात येतात. अविवाहीत लाभार्थ्यांच्या लग्नानंतर त्याची पत्नी ही सहलाभार्थी होईल व त्याची नोंद ग्रामपंचायतीमध्ये करण्यात येते. सदरचे घरकुल हे स्वतःच्या कुटुंबाच्या वापरासाठी असून हस्तांतरीत अथवा विक्री करता येणार नाही याबाबतच्या सूचना लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या आहेत. महिला व बालकल्याण समितीसाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी, महिला बाल व कल्याण अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे असे समितीस सांगितले.

समितीने जिल्हयाच्या एकूण लोकसंख्येपैकी जळगाव जिल्हयात १.८३ लक्ष लोक बेघर आहेत. द्रारिद्रय रेषेत ज्यांना सगळयात कमी गुण असतील त्यांना इंदिरा गांधी घरकुल योजनेचा लाभ देण्याची आवश्यकता असून प्रतिक्षा यादी प्रमाणे लाभार्थ्यांना लाभ दिला गेला पाहिजे. संपूर्ण लाभार्थी पूर्ण करण्यासाठी किती कालावधी लागेल ? अशी विचारणा केली.

प्रकल्प संचालक यांनी संपूर्ण लाभार्थी पूर्ण करण्यासाठी जिल्हा परिषदेला ५ वर्षांचा कालावधी लागणार असून दर वर्षाचे टार्गेट रुपये १५ हजार आहे असे समितीस सांगितले.

समितीने सन २००८-०९ साली रूपये ६७,८३,०००/- इतका खर्च कशासाठी केला आहे अशी विचारणा केली.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.) यांनी सदर खर्च आंगणवाड्यासाठी तसेच विविध प्रकारच्या शैक्षणिक सवलतीसाठी रूपये ७,००,०००/- इतका खर्च करण्यात आला आहे असे समितीस सांगितले.

**विभागीय सचिवांची साक्ष :—**

जळगाव जिल्हापरिषदेस दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने समितीने दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने महिलांच्या योजनेकरिता जेवढी तरतूद होती, तेवढी रक्कम का खर्च करण्यात आली नाही ? अशी विचारणा केली.

मुख कार्यकारी अधिकारी यांनी सन २०१०-११ मध्ये अडचण होती. त्यावेळी निधी खर्च झाला नाही. सन २००८-०९ मध्ये रुपये १७ लाख ६३ हजार शिल्लक होते. एमआरएचएम मधील योजना त्या वर्षी राबवण्यात आली नाही. यामुळे निधी शिल्लक राहिला. सन २००९-२०१० मध्ये रुपये ३० हजार शिल्लक राहिले. पुरवठादाराने वस्तुंचा पुरवठा केला होता. परंतु दि. ३१ जुलै रोजी देयक प्राप्त झाले. सन २०१०-२०११ मध्ये रुपये ५३ लाख शिल्लक राहिले. कोणती योजना राबवावी याचा निर्णय महिला व बालकल्याण समितीमार्फत घेतला जातो. सन २०१४ मध्ये असा निर्णय घेण्यात आला होता की, सर्व वस्तू खरेदी ५० टक्के व प्रशिक्षण ५० टक्के वेगवेगळे प्रशिक्षण देण्यात आले. महिला व बालकल्याण समितीने या बाबत निर्णय घेतलेला आहे. शासन निर्णयानुसार ४ प्रकारचे साहित्य वाटप करण्याचे निश्चित केलेले आहे. पिकोफॉल शिलाई मशिन, पिठाची गिरणी इ. सन २०११-१२ मध्ये संगणक प्रशिक्षण दिले, सौंदर्य प्रसाधन दिले. एमएससीआयटीचे प्रशिक्षण दिले असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार ४ प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते मग इतर वस्तूंचे वाटप का केले जात नाही ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी महिला बाल कल्याण समितीमधील सदस्य ठरवतात की, कोणते साहित्य घ्यावे, त्यानुसार खरेदी केली जाते. त्यामुळे प्रशिक्षणाचा व वाटपाचा काही संबंध नसतो. असे समितीस सांगितले.

समितीने शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या १० टक्के शेष निधीतून अनेक योजना राबविणे आवश्यक असून केवळ पिकोफॉलची योजना राबवली आहे. महिलांकरिता समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आलेले नाही. याबाबत अधिकाऱ्यांविरूद्ध कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? असल्यास विलंबाची कारणे काय आहेत ? अशी विचारणा केली.

मुख्य कार्यकारीअधिकारी यांनी समुपदेशन केंद्र राबवण्याकरिता जिल्हा परिषद व महिला व बाल कल्याण समिती यांच्या समोर विषय ठेवला असता या संदर्भात दर वर्षी ११ लाख रुपयांची तरतूद करावी लागते. मात्र एवढा निधी जिल्हा परिषदेकडून प्राप्त होणे शक्य नाही. यामुळे शासनाकडे याकरिता निधीची मागणी करावी या संदर्भात ठराव करण्यात आला असे समितीस सांगितले.

समितीने जळगाव जिल्हा परिषदेने केलेला हा ठराव योग्य आहे काय? १० टक्के सेस निधी महिलांच्या कल्याणकारी योजनांसाठी असून शासनाने आपल्याला निधी का द्यावा? अशी विचारणा केली.



मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १० टक्के निधी खर्च करावा असा निर्णय आहे. कोणत्या वस्तुकरीता खर्च करावा याचा निर्णय समिती घेते. त्या करिता शासनाचा निर्णय आहे. जिल्हा परिषदेच्या महिला व बाल कल्याण समितीने ही योजना राबविण्याचा निर्णय घेतला. मात्र आर्थिक तरतूद कमी पडू लागल्यामुळे जिल्हा परिषदेने असा निर्णय घेतला की, याकरिता जी तरतूद लागणार आहे, ती शासनाने द्यावी. तशा प्रकारचा ठराव तयार करण्यात आला.याबाबत जिल्हा परिषदेने शासनाला विनंती केलेली आहे. सेस फंड मर्यादित आहे. निधीची रक्कम कमी आहे. सदर योजनेकरिता त्या वर्षी रुपये ६ लाख उपलब्ध होते. बजेटच्या १० टक्के निधी म्हणजे ६ लाख रुपयांमध्ये स्थानिक लोकांच्या गरजेनुसार वेगळया ४-५ योजना हाती घेतल्या होत्या असे समितीस सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :—**

जळगाव, जिल्हा परिषदेला भेट देऊन उक्त भेटीच्या वेळी जिल्हा परिषदेकडून शासन निर्णयानुसार जिल्हा परिषदेच्या (महसुली व आस्थापना खर्च वगळून) एकूण अंदाजपत्रकीय उत्पन्नापैकी १० टक्के निधी महिला व बाल विकासाच्या योजना राबविण्यासाठी जिल्हा परिषदेने तरतूद करून तो खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेची सन २००८-०९ या वर्षाची अर्थसंकल्पीय तरतूद रु.४,७५,१६,००० इतकी होती. या रकमेपैकी महिला व बाल विकासाच्या कल्याणकारी योजनांसाठी रु.८५,४६,००० इतकी रक्कम राखून ठेवण्यात आली होती, सन २००९-१० या वर्षासाठी रु.५,०३,६१,००० इतक्या वार्षिक अंदाजपत्रकीय तरतुदीपैकी रु.६७,९८,००० इतकी रक्कम महिलांच्या विकासाकरिता राखून ठेवण्यात आली होती. तर सन २०१०-११ या वर्षाची एकूण वार्षिक अंदाजपत्रकीय रक्कम रु.४,३८,८५,००० इतक्या तरतुदीपैकी रु.६४,२०,००० इतकी रक्कम महिला व बाल विकासाच्या कल्याणकारी योजनांसाठी राखून ठेवण्यात आली होती. उपरोक्त रकमेचे अवलोकन केले असता सदरची रक्कम शासन निर्णयानुसार १० टक्के तरतूद केल्याचे समितीला सांगण्यात आले. तथापि, उपरोक्त तीनही वर्षांतील तरतूद केलेल्या मंजूर रकमेपैकी अनुक्रमे ६७,८३,०००, ४७,६७,००० आणि १०,३५,००० इतकी रक्कम महिलांच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी खर्च केला असल्याचे समितीला सांगण्यात आले. त्यामुळे निश्चितच संबंधित अधिकाऱ्यांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन झाले आहे असे समितीचे ठाम मत आहे. या एकूण तरतुदींपैकी कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या अशी माहिती विचारण्यात आली असता व त्यात खर्च किती केला अशी माहिती विचारली असता यामध्ये मागासवर्गीय महिलांना मीनी चक्की पुरविणे, शेवया मशीन पुरविणे, पीको फॉल मशीन पुरविणे, अंगणवाडी कार्यकर्ती पुरस्कार, अंगणवाडी साहित्य पुरविणे, इत्यादी योजनांवर खर्च केला असल्याचे समितीला पाठविलेल्या माहितीत नमूद केलेले आहे. तथापि, एकूण तरतुदीपेक्षा अत्यंत अल्प रक्कम उपरोक्त नमूद केलेल्या योजनांवर जिल्हा परिषदेने खर्च केली असल्याचे लेखी स्वरूपात पाठविलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यावरुन दिसून येते. त्याचप्रमाणे साक्षीच्या वेळीदेखील सदरची १० टक्के रक्कम कोणकोणत्या योजनांवर खर्च केली आहे याची माहितीदेखील अधिकाऱ्यांनी परिपूर्णरित्या सांगितलेली नाही. त्यामुळे जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे पालन न केल्यामुळे शासनाने ज्या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या एकूण तरतुदीच्या १० टक्के रक्कम (महसुली व आस्थापना खर्च वजा जाता) तरतूद करून खर्च करणे आवश्यक होती ती खर्च केलेली नाही, असे समितीचे ठाम मत आहे. याबाबत समिती तीव्र खेद व्यक्त करते.

विभागीय सचिवांच्या साक्षीच्या वेळी सन २००८-०९ मध्ये १७,७३,००० रुपये निधी शिल्लक होता. एमआरएचएम योजना राबविण्यात आलेली नाही, सन २००९-१० मध्ये ३०,००० रुपये शिल्लक होते तर सन २०१०-११ मध्ये आर्थिक अडचण असल्यामुळे निधी खर्च झाला नाही. जिल्हा परिषदेमध्ये कोणती योजना राबवावी याचा निर्णय महिला व बालकल्याण समितीमार्फत घेतला जातो. उक्त समितीच्या निर्णयानुसार जिल्हा परिषदेने योजना राबविलेल्या आहेत असे समितीला सांगण्यात आले. एकूणच जिल्हा परिषदेने उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे शासन निर्णयानुसार १० टक्के तरतूद निश्चित करून दिनांक ११ डिसेंबर २००७ रोजीच्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास संबंधित विविध कार्यक्रम राबविण्यासाठी महिला व बाल कल्याण समितीने सदरची योजना राबविणे आवश्यक असताना त्या नियमानुसार राबविण्यात आल्या नाहीत असे समितीला आढळून आले आहे. कारण एकूण तरतुदीपेक्षा समितीला पाठविलेल्या माहितीत व साक्षीच्या वेळी सांगितलेल्या माहितीत अत्यंत तफावत आढळून येत आहे. याचाच अर्थ संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाचे उल्लंघन केले असून त्याद्वारे जिल्हा परिषदेतील महिलांना या योजनेचा लाभ मिळाल्यापासून वंचित ठेवले आहे असे समितीचे मत आहे. कारण प्राप्त अर्थसंकल्पीय तरतुदीपैकी १० टक्के रक्कम (महसुली व आस्थापना खर्च वगळून) पूर्णपणे त्या त्या आर्थिक वर्षांत शासन निर्णयानुसार खर्च केली असल्याचे कुठेही दिसून येत नाही. त्याचप्रमाणे सदरची रक्कम लगतच्या वर्षी खर्च केली किंवा कसे याचाही उल्लेख लेखी माहितीत अथवा साक्षीच्या वेळी समितीला साक्षीत सांगितलेला नाही. त्यामुळे शासनाने ज्या उदात्त हेतूने महिलांकरिता जिल्हा परिषदेने १० टक्के निधी राखून ठेवण्याची तरतूद करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला त्याची अंमलबजावणी संबंधित अधिकाऱ्यांकडून केली जात नाही, ही वास्तविकता आहे. शासनाच्या धोरणाची अंमलबजावणी करणे हे संबंधित अधिकाऱ्याचे कर्तव्य असते त्यांनी कोणत्याही दबावाखाली काम न करता धोरणाची अंमलबजावणी करणे हा त्यांच्या कर्तव्याचाच भाग आहे. प्रस्तुत प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांनी शासन निर्णयाप्रमाणे निधीची तरतूद करून त्याप्रमाणे खर्च केला नसल्यामुळे त्यांनी कर्तव्यात कसूर केली आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. शासनाने ज्या उद्देशाने महिलांचे सबलीकरणासाठी उपरोक्त नमूद केलेला शासन निर्णय निर्गमित केला, त्याचे उल्लंघन होणे हे समितीला कदापिही मान्य नाही.

**सबब, जळगाव, जिल्हा परिषदेने सन २००८-०९, सन २००९-१० आणि सन २०१०-११ या वर्षांत एकूण अंदाजपत्रकीय तरतुदीमधून (महसुली व आस्थापना खर्च वगळून) १० टक्के रक्कम महिला व बाल विकासाच्या विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी तरतूद करणे आवश्यक असताना व तसे अभिप्रेत असताना आवश्यक त्या निधीची तरतूद करून संबंधित योजनांवर खर्च केला नाही. त्यामुळे सदरच्या शासन निर्णयाचे उल्लंघन झाल्यामुळे या प्रकरणी उपरोक्त नमूद वरील तीनही वर्षाच्या रकमेबाबत आवश्यक ती तरतूद करून खर्च केला नाही या बाबतची संबंधित अधिकाऱ्यांची सर्वंकष चौकशी करून सर्व संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियमानुसार कठोर कारवाई करण्यात यावी व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**



# परिशिष्ट - “ब”
# समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**मंगळवार, दिनांक २२ जुलै, २०१४**
**स्थळ : जळगाव, महानगरपालिका**

**उपस्थिती**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(३) श्रीमती शामल बागल, वि.स.स.
(४) डॉ. संजय रायमूलकर, वि.स.स.
(५) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
श्री.विलास आठवले, उप सचिव

**जळगाव महानगरपालिका स्थानिक प्रतिनिधी**

(१) सौ. राखी शामकांत सोनवणे, महापौर
(२) सौ. ज्योती शैलेंद्र इंगळे, सभापती, म.व.बा.क.
(३) डॉ. वर्षा नारायण खडके, नगरसेविका
(४) सौ. ममता संजय कोल्हे, नगरसेविका
(५) सौ. संगिता मोहनदास राणे, नगरसेविका
(६) सौ. गायत्री उत्तम शिंदे, नगरसेविका
(७) सौ. दिपाली दुर्गेश पाटील, नगरसेविका
(८) श्रीमती शोभाबाई दिनकर बारी, नगरसेविका
(९) सौ. आश्विनी विनोद देशमुख, नगरसेविका
(१०) सौ. उज्वला किशोर बाविस्कर, नगरसेविका
(११) सौ. जयश्री नितीन पाटील, नगरसेविका
(१२) सौ. दिपमाला मनोज काळे, नगरसेविका
(१३) सौ. सुचिता अतुलसिंग हाडा, नगरसेविका
(१४) सौ. उज्ज्वला मोहन बेंडाळे, नगरसेविका
(१५) सौ. ज्योती बाळासाहेब चव्हाण, नगरसेविका
(१६) श्रीमती पार्वताबाई दामू भिल, नगरसेविका
(१७) सौ. लिना (राम) नविन पवार, नगरसेविका
(१८) सौ. मंगला संजय चौधरी, नगरसेविका
(१९) सौ. लता अंबादास मोरे, नगरसेविका



**जळगाव, महानगरपालिका**

श्री. संजय कापडनीस, आयुक्त
श्री. रामनाथ सोनवणे, माजी आयुक्त
श्री. साजिद खान पठाण, अप्पर आयुक्त
श्री. अविनाश गांगुर्डे, उपायुक्त
श्री. खरात, मुख्य लखापरीक्षक
श्री. एस.बी.भोर, मुख्य लेखाधिकारी
डॉ. राम रावलानी, मुख्य वैद्यकीय अधिकारी
श्री. चंद्रकांत वांदळे, अधीक्षक
श्रीमती मिना लोखंडे, महिला तक्रार निवारण अध्यक्षा
श्रीमती आशा चौधरी, समुहसंघटक
श्री. निरंगज सैंदाणे, नगरसचिव
श्री. महाजन, प्रशासकीय अधिकारी
श्री. डी. आर. पाटील, आस्थापना

**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**बुधवार, दिनांक २३ जुलै, २०१४**
**स्थळ : जळगाव, जिल्हा परिषद**

**उपस्थिती**

(१) श्रीमती निर्मला गावित, वि.स.स.तथा समिती प्रमुख
(२) श्रीमती मिनाक्षी पाटील, वि.स.स.
(३) श्रीमती शामल बागल, वि.स.स.
(४) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स.
(५) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,**
श्री. विलास आठवले, उप सचिव

**स्थानिक लोकप्रतिनिधी**

(१) श्री. दिलीप खोडपे, जि.प.,अध्यक्ष

(२) श्री. राजेंद्र राठोड, समाजकल्याण सभापती

(३) श्रीमती पुष्पाताई तायडे, सदस्य

(४) श्रीमती मीनाताई पाटील,सदस्य

**जिल्हा परिषद, जळगाव**

(१) श्री. सुनील गायकवाड, प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी,

(२) सौ. मिनल कुटे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, सा.प्र.वि.

(३) श्री. राजन पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)

(४) श्री. सुनील लक्ष्मण दुसाने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)

(५) श्री. वसंत पाटील, प्रकल्प संचालक

(६) श्री. सोमनाथ बनसोडे, उप आयुक्त (विकास) विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक

(७) डॉ. शिवाजी पवार, जिल्हा आरोग्य अधिकारी,

(८) डॉ. विनोद राईकवार,जिल्हा पशुसवंधन अधिकारी

(९) पुरूषोत्तम ठाकूर, कार्यकारी अभियंता (ग्रा.पा.पु.वि.जि.प.)

१०) श्री. आर. के. पालवे, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(११) श्री. ए. डी. वाणी, प्र. कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु.वि.)

(१२) श्री. एस. बी. हिंगोणेकर, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१३) श्री. एस. डी. पाटील, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१४) श्रीमती प्राची अ. वाजे, जि.स.क.अ., जिल्हा परिषद

(१५) श्रीमती आशा चौधरी, समूह संघटक



**महिलांचे हक्क व कल्याण समिती**

**बुधवार, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५**

**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(७) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(८) श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स.

(९) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्रीमती पुनम ढगे, अवर सचिव

(३) श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी

**महिला व बालकल्याण विभाग**

श्री. संजय कुमार, प्रधान सचिव

**ग्रामविकास विभाग**

श्री. व्ही. गिरीराज, प्रधान सचिव

**शालेय शिक्षण विभाग**

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव

**सार्वजनिक आरोग्य विभाग**

(१) श्रीमती सुजाता सौनिक, प्रधान सचिव

(२) डॉ. सतीश पवार, संचालक आरोग्य सेवा

**पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

श्री. एम.डी. पाठक, सचिव

**नगरविकास विभाग**

श्रीमती मनिषा म्हैसकर, सचिव

**सामान्य प्रशासन विभाग**

श्री. प्रमोद त्र्यं. नलावडे, सचिव

**सामाजिक न्याय विभाग**

श्री. उ. शि. लोणारे, सह सचिव

**विभागीय अधिकारी**

(१) श्री.संजय कापडनीस आयुक्त, जळगाव.

(२) श्री. अस्तिक कुमार पांडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जळगाव.



**महिलांचे हक्क व कल्याण समिती**
**बुधवार, दिनांक ६ एप्रिल, २०१६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**समिती प्रमुख**

(१) श्रीमती मनिषा चौधरी, वि.स.स.

**समिती सदस्य**

(२) श्रीमती मंदा म्हात्रे, वि.स.स.

(३) श्रीमती मोनिका राजळे, वि.स.स.

(४) श्रीमती सीमा हिरे, वि.स.स.

(५) डॉ. भारती लव्हेकर, वि.स.स.

(६) श्रीमती स्नेहलता कोल्हे, वि.स.स.

(७) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.

(८) श्रीमती स्मिता वाघ, वि.प.स.

(९) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्रीमती मा. म. सुर्वे, कक्ष अधिकारी.

समितीने उक्त बैठकीत जळगाव, महानगरपालिका व जळगाव, जिल्हा परिषद येथे दिलेल्या भेटीच्या संदर्भात प्रारुप अहवालावर विचार विनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई